RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२६ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## काँग्रेसच्या नेत्यांनी सबुरीने घ्यावे अति आत्मविश्वास काँग्रेसचा घात करू शकतो

### दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी टोचले राज्यातील नेत्यांचे कान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नवी दिल्ली**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाची चर्चा सुरू आहे. यातच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्लीमध्ये काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली. जागा वाटपात जास्तीत जास्त जागा पदरात पाडून घेण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. मात्र, दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी काँग्रेस नेत्यांचे कान टोचले असल्याचे समोर आले आहे. मुख्यमंत्री पदाचा चेहऱ्याबाबत राज्यातील नेत्यांनी सबुरीने घ्यावे, असा सल्ला दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी दिला आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला राज्यामध्ये चांगले यश मिळाले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षातील राज्यातील नेत्यांचे मनोबल उंचावले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत देखील असेच यश पक्षाला मिळेल, अशी आशा राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना आहे. त्यामुळे महाविकास आघाडी मधील जागा वाटपात जास्तीत जास्त जागा मागण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. मात्र नेत्यांमधील अति आत्मविश्वास काँग्रेसचा घात करू शकतो. त्यामुळे सध्या सबुरीने घेण्याचा सल्ला काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाने राज्यातील नेत्यांना दिला आहे.



**नाना पटोले यांच्या नावाची चर्चा**

मुख्यमंत्री पदाबाबत महाविकास आघाडीमध्ये रस्सीखेच सुरू असल्याचे दिसून येत आहे. महाविकास आघाडीच्या माध्यमातून मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांच्या वतीने करण्यात आली आहे. मात्र निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करायला काँग्रेसच्या राज्यातील नेत्यांचा विरोध आहे. शरद पवार यांच्या पक्षाच्या वतीने देखील सध्या याबाबत घाई करण्यात अर्थ नसल्याचे म्हटले आहे. तर दुसरीकडे नागपूर काँग्रेस मधील पदाधिकाऱ्यांनी नाना पटोले यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी पुढे केले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दिल्लीतील वरिष्ठ नेत्यांनी काँग्रेसच्या नेत्यांची कान टोचले असल्याची माहिती समोर आली आहे.

## संजय राऊत अब्रुनुकसानीच्या खटल्यात दोषी १५ दिवसांच्या तुरुंगवासाची शिक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ मुंबई**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. अब्रुनुकसानीच्या खटल्या प्रकरणी संजय राऊत यांना दोषी ठरवण्यात आले आहे. राऊत यांना आता कोर्टाने १५ दिवसांची कैद सुनावण्यात आली आहे. मेधा किरीट सोमय्या यांनी हा खटला दाखल केला होता, या खटल्या प्रकरणी आता हा निकाल कोर्टाने दिला आहे.

मेधा किरीट सोमय्या यांनी हा खटला खासदार संजय राऊत यांच्याविरोधात दाखल केला होता. हा खटला माझगाव कोर्टात दाखल केला होता. राऊत यांच्याविरोधात अब्रुनुकसानीचा आरोप केले होते. या प्रकरणी गेल्या काही महिन्यापासून सुनावणी सुरू होती. दरम्यान, आता कोर्टाने निकाल



दिला आहे. संजय राऊत यांना दोषी आढळल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी संजय राऊत यांना १५ दिवसांचा तुरुंगवास आणि २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.आयपीसी सेक्शन ५०० अंतर्गत ही याचिका दाखल केली होती. या प्रकरणी मागील काही महिन्यांपासून सुनावणी सुरू होती. आता आज हा निकाल कोर्टाने दिला आहे. संजय राऊत यांना दोषी सिद्ध करण्यात आले आहे. आता संजय राऊत या निर्णयाविरोधात पुढच्या कोर्टात जाऊ शकतात.

**अब्रुनुकसानीच्या प्रकरणात संजय राऊतांना दिलासा; अटकपूर्व जामीन मंजूर**

मेधा सोमय्या यांच्याकडून तक्रार करण्यात आलेल्या अब्रुनुकसानीच्या प्रकरणात संजय राऊत यांना माझगाव सत्र न्यायालयाने त्यांना दोषी ठरवलं. त्यांना १५ दिवसांची कोठडी सुनावण्यात आली. त्यानंतर लगोलग संजय राऊत यांच्याकडून अटकपूर्व जामीनासाठी अर्ज करण्यात आला. आता या प्रकरणात संजय राऊतांना दिलासा मिळाला आहे. संजय राऊतांचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे. १५ हजारांच्या जातमुचलक्यावर संजय राऊतांना जामीन मंजूर झाला आहे. ३० दिवसांच्या आत वरच्या कोर्टात अपिल करून दाद मागण्याची मुभाही कोर्टाकडून देण्यात आली आहे.

## छत्रपतींचा पुतळा उभारताना अक्षम्य चुका

### गंज, चुकीची वेल्डिंग, कमकुवत फ्रेममुळे पुतळा कोसळला, चौकशी समितीचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ राजकोट**



मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गंज, कमकुवत फ्रेम व चुकीच्या वेल्डिंगमुळे कोसळला, असा ठपका चौकशी समितीने आपल्या अहवालात ठेवला आहे. या अहवालामुळे छत्रपतींचा पुतळा उभारताना अक्षम्य चुका झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या महिन्यात कोसळला होता. याप्रकरणी सरकारने एक चौकशी समिती स्थापन केली होती. तसेच या समितीलाा ३० दिवसांच्या आत आपला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. या समितीने आता आपला १६ पानी अहवाल सरकार दरबारी सादर केला आहे. त्यात हा पुतळा कमकुवत फ्रेम आणि पुतळ्यात गंज चढल्यामुळे कोसळल्याचा दावा केला आहे.

भारतीय नौदलाचा वीस वर्षांहून अधिक अनुभव असलेले कमोडोर पवन धिंग्रा यांच्या अध्यक्षतेखाली, पाच सदस्य समितीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, बांधकाम विभागाचे माजी मुख्य अभियंता विकास रामगुडे, आयआयटीचे प्रा. जांगिड, प्रा. परिदा यांचा समावेश होता.

**चौकशी अहवालात काय म्हटले**

मालवण पुतळा दुर्घटना प्रकरणात चौकशी समितीने १६ पानांचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे. पुतळ्यातील गंज, कमकुवत फ्रेम आणि चुकीच्या वेल्डिंग कामामुळे हा पुतळा कोसळल्याचे, या अहवालात म्हटले आहे. पुतळा उभारलेले फ्रेमवर्क तितके मजबूत नव्हते. तसेच देखभाल योग्य पद्धतीने झाली नसल्याने पुतळ्याला काही ठिकाणी गंज चढला होता, असेही या अहवालात म्हटले आहे.

## अजित पवार पत्रकारांना रागावले; म्हणाले, केव्हाही दांडकं समोर करायचं का?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा स्पष्टवक्तेपणा अनेक ठिकाणी दिसून येतो. गुरुवारी अमरावती दौऱ्याच्या वेळी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना देखील त्याचा अनुभव आला. येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनात विविध विकासकामांचे उद्घाटन केल्यानंतर ते सभागृहातून बाहेर पडत असताना प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी त्यांना गाठले. अजित पवार म्हणाले, मी कार्यक्रमात एवढा वेळ बोललो, तरीही तुम्हाला कळले नाही का, माझे काय विचार आहेत. काय नाहीत. केव्हाही आपलं दांडकं समोर करायचं?

प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पुणे दौरा रद्द झाल्याविषयी विचारणा केल्यावर अजित पवार म्हणाले, अरे वेड्या, ते सकाळीच ठरलेले आहे. मी इथे यायच्या आधीच आम्हाला पंतप्रधान कार्यालयातून फोन आला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा देखील फोन आला होता. पुणे येथे दुपारी ३ वाजेपासून आणखी पाऊस वाढणार, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पाऊस जास्त पडला, तर जलमय स्थिती होते आणि ये-जा करणे अडचणीचे होते. पुणेकरांची गैरसोय होईल. ज्या भागात दौरा असेल, तेथील नागरिकांना कुठलाही त्रास होता कामा नये, असा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कटाक्षाने प्रयत्न असतो. त्यामुळे पंतप्रधानाचा दौरा रद्द नव्हे, तर स्थगित करण्यात आला आहे. परिस्थिती सामान्य झाल्यानंतर पंतप्रधान पुणे येथे येतील.

संजय राऊत यांनी महायुतीवर केलेल्या टीकेसंदर्भात विचारले असता, अजित पवार चिडले. म्हणाले, मी तुम्हाला एक सांगू का, मला माझ्यापुरते विचारा. रोज कोण सकाळी उठतो आणि बोलतो, त्यावर दररोज काय प्रतिक्रिया देणार. महायुतीच्या जागावाटपाची चर्चा सध्या सुरू आहे. पत्रकारांनी थोडा संयम बाळगावा. महायुतीचे जागा वाटपाचे ठरले, की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मी स्वत: पत्रकार परिषदेत घोषणा करणार आहोत.

अमरावतीच्या काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके या महायुतीच्या उमेदवार असतील का, या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, महाराष्ट्रातील २८८ जागांपैकी महायुतीच्या घटक पक्षांपैकी कोणत्या पक्षाला कोणत्या जागा मिळतील, तेच आता ठरलेले नाही. एकदा जागा तर ठरू द्या.अजित पवार यांचे गुरुवारी सकाळी शहरात आगमन झाले. त्यांच्या हस्ते नियोजन भवन येथे अमरावती विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचे उद्घाटन झाले. जीवन प्राधिकरण तपोवन - परिसर येथे अमृत-२ वाढीव पाणीपुरवठा योजना प्रकल्पाच्या कोनशिलेचे अनावरण यासह अन्य कामांचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले.

## देवेंद्र फडणवीस म्हणतात, शिंदे गट, अजित पवार गट नवे पक्ष; लोकसभेत 'या' बाबतीत कामगिरी वाईट झाल्याची कबुली!

**विदर्भ प्रजसत्ताक दि.२६ मुंबई**

गेल्या अडीच वर्षांत शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळातील दोन महत्त्वाच्या पक्षांमध्ये उभी फूट पडली. त्यातून आधी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेतील आमदार मोठ्या संख्येनं बाहेर पडले तर नंतर अजित पवारांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीच्या ४० आमदारांनी भाजपा-शिंदे गट युतीशी हातमिळवणी केली. मात्र, या दोन्ही गटांनी आजतागायत राजकीय वर्तुळात व प्रत्यक्ष कोर्टातही आपणच मूळ शिवसेना वा राष्ट्रवादी काँग्रेस असल्याची भूमिका ठाम ठेवली आहे. आता मात्र भारतीय जनता पक्षाचे राज्यातील सर्वात महत्त्वाचे नेते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या एका विधानामुळे तर्क-वितर्कांना उधाण आलं आहे.



इंडिया टुडेच्या मुंबई कॉन्क्लेव्हमध्ये देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. यावेळी त्यांनी मुलाखतीदरम्यान अनेक प्रकारच्या राजकीय प्रश्नांची उत्तरं दिली. यामध्ये मुलाखतीच्या सुरुवातीलाच त्यांना लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष कमकुवत पडला का? असा प्रश्न विचारला असता हा दावा त्यांनी फेटाळून लावला.

भाजपाला कमकुवत म्हणणं हे चुकीचं विश्लेषण आहे. ज्यानं हे विश्लेषण केलं त्यांना पुन्हा नव्याने विश्लेषण करायला शिकवावं लागलं. भाजपानं ९ जागा जिंकल्या. १२ जागांवर भाजपा ३ टक्क्यांपेक्षा कमी फरकानं हरली आहे. पूर्ण विश्लेषणात आम्हीच पहिल्या क्रमांकाचा पक्ष आहोत. आम्हालाच सर्वाधिक मतं मिळाली आहेत. त्यामुळे भाजपा सगळ्यात कमकुवत पक्ष आहे असं बोलणं चुकीचं आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.दरम्यान, शिंदे गट व अजित पवार गटाशी युती करूनही त्यांची मतांच्या रुपात साथ लोकसभा निवडणुकीत मिळाली नाही का? अशी विचारणा केली असता फडणवीसांनी महत्त्वपूर्ण विधान केलं. त्यावरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

## रेकॉर्डब्रेक पावसामुळे उडाली पुणेकरांची दाणादाण, ८६ वर्षांनी ढगांनी पाण्याचा इतका रतीब घातला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ पुणे**

पुणे शहरासह जिल्ह्यात धुमाकूळ घातलेल्या पावसाने गेल्या २४ तासांत सप्टेंबरमधील सर्वाधिक पाऊस पडला आहे. पुण्यात दोन दिवसापासून पावसाने पुण्याला झोडपले आहे. पुण्यात मागच्या २४ तासांत १३३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. ५ ऑक्टोबर २०१० नंतर प्रथमच पुण्यात एवढा पाऊस पडला आहे. पुण्यातील पावसामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींच दौरा देखील रद्द करण्यात आला आहे.

संपूर्ण पुणे शहराला मुसळधार पावसानं अक्षरश: झोडपून काढलंय. पावसामुळे पुण्यातील अनेक भागांत पाणी शिरलं. सायंकाळी अचानक आलेल्या पावसामुळे पुणेकरांची तारंबळ उडाली. यामुळे लोकांच्या मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली. पुण्यात मागील २४ तासात १३३ मिमी पावसाची नोंद झाली. आतापर्यंतची तिसरी सर्वोच्च पावसाची आकडेवारी आहे. पुण्यात मागील २४ तासात झालेला पाऊस हा सप्टेंबर महिन्यातील सर्वाधिक पाऊस आहे. तर आतापर्यंतची तिसरी सर्वाधिक पावसाची आकडेवारी आहे.

**मागील २४ तासात १३३ मिमी पावसाची नोंद**

याआधी पुण्यात ५ ऑक्टोबर २०१० रोजी १८१.१ मिमी पावसाची नोंद झाली होती. तर १७ ऑगस्ट १९८७ रोजी १४१.७ मिमी पाऊस झाला होता. त्यानंतर पहिल्यांदाच इतका मोठा पाऊस मागील २४ तासात काल झाला. ज्यामध्ये मागील २४ तासात १३३ मिमी पावसाची नोंद झाली आहे . मागील अनेक वर्षातील सप्टेंबर महिन्यातील पावसाच्या आकडेवारीचा विचार केला तर




याआधी २१ सप्टेंबर १९३८ रोजी १३२.२ मिमी पाऊस झाला होता. तर २६ सप्टेंबर १९७१ रोजी ११५३ मिमी पाऊस झाला होता.

**पुण्यासाठी देखील रेड अलर्ट जारी**

राज्यात पुढील दोन दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह उपनगरात आज देखील मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मुंबईला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आले आहे. पुण्यासाठी देखील रेड अलर्ट जारी करण्यात आली आहे. घाट माथ्यावर अतिवृष्टीची शक्यता आहे.

**पावसाचे विघ्न! पीएम मोदींचा पुणे दौरा रद्द**

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पुणे दौरा रद्द करण्यात आला आहे. पुण्यामध्ये मोदींच्या हस्ते भूमिगत मेट्रोचे लाकार्पण होणार होते. पण हवामान खात्याकडून पुण्याला पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. पावसाची शक्यता लक्षात घेता पीएम मोदींचा पुणे दौरा रद्द करण्यात आला. पंतप्रधान कार्यालयाकडून मोदींचा पुणे दौरा रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज तब्बल १२ विकास कामांचं उद्घाटन तसेच मेट्रोच्या मार्गाचे लोकार्पण होणार होते. पुण्यातील एसपी कॉलेजच्या मैदानावर सभेचे देखील आयोजन करण्यात आलं होतं. मात्र या सभेवर गेल्या तीन दिवसांपासून पावसाचे सावट असल्यामुळे ही सभा होणार का नाही असा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर आज पंतप्रधान कार्यालयाकडून मोदींचा पुणे दौरा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहेस्वारगेट ते सिविल कोर्ट या भूमिगत मेट्रोचा लोकार्पण देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार होतं. एस पी कॉलेजच्या मैदानावर कालपासून प्रशासनाकडून तयारी देखील करण्यात आली होती. पावसाचे सावट लक्षात घेता सभेचे ठिकाण देखील बलण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पर्यायी सभास्थळ म्हणून गणेश कला क्रीडा मंच या ठिकाणी देखील तयारी करण्यात आली होती. मात्र पुण्यात होत असलेल्या पावसामुळे पंतप्रधानांचा दौरा रद्द करण्यात आला आहे.

## संपादकीय ......

# नद्यांतील कचरा समस्या चिंताजनक

ज्या देशांत, समाजात नदी, पर्वतरांगा या वंदनीय, पूजनीय नाहीत तेथे मात्र त्यांच्या उगमस्थानाचे, काठाचे पावित्र्य जपण्यात आले असून स्वच्छता, नितळ सौंदर्यही अबाधित राखण्यात आले आहे. आम्ही मात्र नद्यांचे-पर्वतांचे मारेकरी आहोत. नर्मदा असो किंवा कृष्णा, गंगा किंवा यमुना नदी या नद्या श्रद्धास्थानी आहेत. दुर्दैव म्हणजे आपणही तेवढ्याच प्रमाणात तेथे श्रद्धेने कचरा टाकतो.

सर्वजण निसर्गाला ईश्वर मानतो, त्याची पूजा करतो. नदी, पर्वतरांगा, सूर्य, चंद्र या सर्व गोष्टी आपल्यासाठी पूजनीय आणि वंदनीय आहेत. जगासाठी आपण भारतीय असामान्य आहोत. जगात अन्यत्र कोठेही अशा प्रकारची श्रद्धा पाहावयास दिसत नाही. नद्या तर आपल्यासाठी जीव की प्राण! गंगा नदीला तर आई मानतो. नर्मदेला महादेवाची कन्या मानले आहे. भारतीय संस्कृतीचे पालन पोषणही नदीकाठावर अधिक दिसून येते. देशातील सर्वच नद्यांची नियमितपणे पूजा अर्चा होताना आणि त्याविषयी श्रद्धा बाळगत असताना मध्य प्रदेशातील नर्मदेबाबत एक परिणामकारक निर्णय घेतला गेला. नर्मदा नदीचे उगमस्थान मध्य प्रदेशात असल्याने सरकारने घेतलेला निर्णय महत्त्वाचा. या सरकारने ज्या ठिकाणांहून नर्मदा वाहते तेथील काठावरची शहरे, गावांत मद्यपान आणि मांसाहार यासारख्या गोष्टींवर निर्बंध लावण्याचे ठरविले. यामागचा उद्देश नर्मदा नदीचे पावित्र्य जपणे. यानुसार नदीचे पावित्र्य जपण्यासाठी नदी काठावर मांसाहार अणि मद्यपान करता येणार नाही. मध्य प्रदेशच्या अमरकंटक येथे उगम पावणारी आणि खुंबाटच्या खाडीत मिसळणारी नर्मदा नदी १ हजार ३१२ किलोमीटरचा अंतर कापते आणि मध्य प्रदेशातील तिचा प्रवास १ हजार ७९ किलोमीटर आहे. राज्यातील २१ जिल्हे, ६८ तहसील आणि एक हजार १२६ घाट नर्मदा नदीने व्यापलेले आहेत. मध्य प्रदेश सरकारच्या निर्णयाचा दूरगामी परिणाम या सर्व भागांवर होणार, हे निश्चित!

नर्मदा नदीची काळजी यापूर्वी एवढ्या प्रमाणात घेतल्याचे ऐकिवात नाही. अनंत काळापासून वाहत आलेल्या नर्मदा नदीला आता मद्य आणि मांसाहाराच्या सावलीतून वाचविण्यासाठी पुढाकार घेतला गेला असून ती मोठी बाब मानावी लागेल. आतापार्यंत केवळ गंगा नदीबाबतच बोलले जायचे. तिची स्वच्छता, तिचे पावित्र्य जपण्याचाच मुद्दा मांडला जायचा आणि आजही दिसतो. अर्थात, गंगा नदी सुमारे ४० कोटी लोकांचे पालन पोषण करते. गंगा नदीच्या काठावर वसलेल्या ९७ शहरांतील मद्यपान, मांसाहाराबाबत काही बोलू शकत नाही; पण या शहरांतून २ हजार ९५३ दशलक्ष मीटर सांडपाणी बाहेर पडते आणि ते गंगा नदीत मिसळले जाते. हे प्रकार थांबविण्यासाठी १९८३ मध्ये 'मिशन क्लिन गंगा' नावाची मोहीम सुरू केली आणि सर्वांनी पोटचा मारा करून कोट्यवधीचा पैसा गंगा नदीसाठी खर्च केला. त्याच्या खर्चाचा अंदाज लावायचा असेल, तर २०१४ ते आतापर्यंत दहा वर्षांत 'नमामि गंगे' प्रकल्पापोटी ४० हजार कोटी रुपये खर्च केले गेले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने २०१८ रोजी जारी केलेल्या अहवालानुसार भारतात ३५१ नद्या दूषित आहेत.

निसर्गावरचे प्रेम आपले स्पृहनीय आहे. पिंपळाच्या झाडाची आम्ही पूजा करू, नद्यांची पूजा करू, पर्वताला नमस्कार करू; पण अशी पूजा काय कामाची की, ती झाल्यावर त्याचा सर्व कचरा नदीत टाकत हात झटकत निघून जाऊ. वृक्ष पूजनीय आहे; पण त्यांना तोडताना, कापताना थोडाही वेळ दवडत नाहीत. नद्या पूजनीय म्हणतो, पण पूजा आटोपल्यानंतर कॅरिबॅगमध्ये पूजेचे राहिलेले साहित्य गोळा करून ते नदीत टाकतो आणि हात जोडत निघून जातो. शिखरे पूजनीय आहेत; पण डोंगरावर, पर्वतांवर प्लास्टिकच्या कॅरिबॅग, पेपर नॅमकिन, दारूच्या बाटल्या, यूज अँड थ्रोचे ग्लास असा बराच कचरा दिसतो. पर्वतावर बर्फ फेकणारे, धबधब्याचा आनंद घेणारे, पठारावर भटकंती करणारे भरपूर आहेत; पण त्याची शिक्षा पर्वतांना मिळत आहे, याचा कधी विचार केला का? या सर्व गोष्टी ठाऊक असतानाही कचरा फेकताना त्याचा अजिबात विचार केला जात नाही. ही स्थिती अशीच राहिली, तर कालांतराने पर्वत, डोंगररांगा मातीत मिसळून जातील आणि झाडांची, जंगलाचीही अशीच अवस्था होईल.

# शेतमजुर आदिवासी महिलेचा विजेचा शॉक लागुन बाळासह दुर्दैवी मृत्यु

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती-** कोठा गावाच्या परीसरात ८ सप्टेंबर च्या रात्री दोन अस्वलींचा करंट लागून शेतात मृत्यू झाला होता. आता पुन्हा धारणीच्या कुटंगा गावात शेतामध्ये काम करत असताना बुली ठाकरे नावाच्या आदिवासी महिलेचा व तिच्या अडीच वर्षाच्या बाळाचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

धारणीपासून ३३ किलोमीटर अंतरावरील कुटंगा गावातील बुली लक्ष्मण ठाकरे (वय ४३) आपल्या अडीच मुलीला कुशीत घेऊन शेतात काम करत असताना करंट लागून जागेवरच मरण पावल्याने एकच दहशत पसरली आहे. मंगळवार २४ सप्टेंबर रोजी सकाळी ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनात कारवाई झाल्यानंतर मृतदेह उपजिल्हा रुग्णालयात पोस्टमॉर्टमसाठी रवाना करण्यात आले. या प्रकरणाची पुढील चौकशी गणेश घुले, अनुराग कथिलकर करत आहेत.उल्लेखनीय म्हणजे सप्टेंबर महिन्यात कोठा येथील भुरेलाल आणि दुर्वेश या दोघांचा जिवंत तारामध्ये पाय अडकल्याने करंट लागून दुर्दैवी मृत्यू झाला होता. मात्र या घटनेची दखल कुणीच घेतली नाही. त्यामुळे मंगळवारी कुटंगा येथे या घटनेची पुनरावृत्ती होवून मायलेकीचा मृत्यू झाला आहे. सनद असे की, महावितरणच्या लाईनची अवस्था फारच खराब असून जागोजागी डीपी किंवा कृषी कनेक्शन उघडे पडल्याचे चित्र आहे. एवढेच नाहीतर जीवंद तारा खाली लोंबकलेल्या असतात, याकडे महावितरण विभागाने जातीने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

# भूकंपाचे हादरे विरोधकांना बसतील : बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६नाशिक :** केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्या महाराष्ट्र दौऱ्याची काँग्रेस व शरद पवार गटाचे जयंत पाटील यांना भीती लागून असते. घाबरलेल्या विरोधकांकडून घटस्थापनेला राज्यात राजकीय भूकंप होणार असल्याचे सांगितले जाते. पण राज्यात जेवढे भूकंप व्हायचे ते होऊन गेले आहेत. महायुतीला विधानसभेत भरघोस यश मिळणार असून, त्याचे हादरे विरोधकांना बसतील, अशी टीका भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. हिंदुत्वापासून दूर गेलेले उद्धव ठाकरे मुख्यमंत्री पदासाठी लाचार असल्याचा आरोप त्यांनी केला.

चंद्रशेखर बावनकुळे हे बुधवारी (दि. २५) भाजपच्या उत्तर महाराष्ट्र कार्यकर्ता महाशिबिरानिमित्ताने नाशिकमध्ये आले. याप्रसंगी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, शाह यांच्या महाराष्ट्रातील दौऱ्यांमुळे विरोधकांची घाबरगुंडी उडाली आहे. त्यांना झोपदेखील लागत नसल्याची टीका केली. उद्धव ठाकरे हिंदुत्वापासून दूर गेल्याने शरद पवार व काँग्रेसच्या दारात मुख्यमंत्री पदासाठी कटोरा घेऊन फिरण्याची वेळ त्यांच्यावर ओढावली. याच लाचारीमुळे लोक त्यांना सोडून जात आहेत, अशा शब्दांत बावनकुळे यांनी ठाकरेंवर निशाणा साधला.



नागपूरमधील कोराडी येथील महालक्ष्मी मंदिरावरून सुरू असलेल्या राजकारणावर बावनकुळे यांनी खंत व्यक्त केली. मी त्या संस्थानाचा मागे अध्यक्ष होता. ते धार्मिक व सामाजिक स्थळ आहे. संस्थानाला १ कोटी ४८ लाख रुपये भरायचे आहे. नाना पटोले व विजय वडवेट्टीवार हे महालक्ष्मी देवीचे दर्शन घेऊन निवडणुकीत अर्ज भरतात असे सांगत कोणत्याही धार्मिक देवस्थानावरून राजकारण करू नये, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

# लिंबूवर्गीय फळपिकांवरील रोग प्रसारक सिट्रस सायला किडीचे असे करा नियंत्रण

**दि.२६ विदर्भ प्रजासत्ताक -** सद्यस्थितीत आंबिया बहारातील लिंबूवर्गीय फळपिकांना नवीन पालवी फुटत आहे. या नवतीवर पानांचा रस शोषणाऱ्या किडी सक्रिय झाल्या आहेत.सिट्रस सायला ही रस शोषणारी किड रोग प्रसारास सुद्धा कारणीभूत असते. त्यामुळे होणारे फळपिकांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी योग्य वेळी खालील प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे फायद्याचे ठरेल.

**किडीची नुकसान करण्याची पद्धत**

- किडीची पिल्ले व प्रौढ कोवळे शेंडे, पाने आणि कळ्यांमधील रस शोषुन घेतात त्यामुळे पाने मुरडली जातात, गळतात व शेंडे सुद्धा वाळतात.

- पिल्ले मधासारखा चिकट, गोड, पांढरा पदार्थ स्त्रावित करतात ज्यावर काळी बुरशी झपाट्याने वाढते.

- या बुरशीचा थर पानांवर व फांदीवर दिसुन येतो त्यामुळे प्रकाश संश्लेषणाची क्रिया मंदावते. प्रादुर्भाव जास्त आढळल्यास फळधारणेवर सुद्धा परीणाम होतो. सायला किडीमुळे 'ग्रीनींग' जिवाणूचा प्रसार होतो त्यामुळे शेंडेमर रोग झपाट्याने वाढतो.

**आर्थिक नुकसानीची पातळी**

१० से. मी. शेंड्यावर ६-१० सायला कीड.



**व्यवस्थापन कसे कराल?**

**१) प्रतिबंधात्मक उपाय**

- किडग्रस्त व वाळलेल्या फांदया काढुन टाकाव्यात आणि झाडाचा घेर प्रमाणात ठेवावा ज्यामुळे भरपुर सुर्यप्रकाश जमिनीवर पोहचू शकेल.

- संत्राबागेत किंवा आजुबाजुला गोड लिंबाची झाडे नसावीत कारण हि झाडे सायला किडीचे खाद्य असुन प्रजननाचे फार मोठे स्त्रोत ठरू शकते.

- खताचा व पाण्याचा वापर नियंत्रीत ठेवावा ज्यामुळे झाडांना येणारी नवीन पालवी नियंत्रणात ठेवता येईल.

**२) जैविक उपाय**

नवतीच्या हंगामात पेट्रोलियम स्प्रे ऑईल (मॅक ऑल सीझन हॉर्टीकल्चरल मिनरल ऑईल) २ टक्के (२० मिली प्रती लिटर) किंवा नीम तेल १ टक्का (१० मिली प्रती लिटर) किंवा नीम सोप किंवा पोंगामिया (करंज) सोप ५ ग्रॅम प्रती लिटर पानकळया उमलण्याच्या वेळी किंवा किडीचा प्रादुर्भाव दिसताच फवारणी करावी.

**३) रासायनिक उपाय**

किडीचा प्रादुर्भाव लक्षात येताच थायमेथोक्झाम (२५ डब्लू जी) ०.३ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड (१७.८ एस.एल.) ०.५ मिली. किंवा डायमिथोएट (३० ई.सी.) २.० मि.ली. किंवा सायनट्रानीलीप्रोल* (१०.२६% ओडी) ०.६ मिली प्रती लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी १५ दिवसाच्या अंतराने करावी.

(लेबल क्लेम नसलेले परंतु संशोधनाच्या आधारावर प्रभावी आढळुन आलेले किटकनाशक)

**- केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्था नागपूर**




## मॉर्निंग वॉक करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? शारीरिक - मानसिक तणाव कमी करण्यासाठी..

**विदर्भ प्रजासत्ताक**

फिट राहण्यासाठी आपण बऱ्याच प्रकारचे व्यायाम करतो त्यातील एक म्हणजे वॉकिंग. चालल्याने आपले वजन तर कमी होतेच, शिवाय गंभीर आजारांचा धोकाही कमी होतो रोज मॉर्निंग वॉक करण्याचे अनेक फायदे आहेत. मोकळ्या आणि ताज्या हवेत फिरल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो.




वॉकिंग करताना कोणी सोबत असेल तर, आपल्याला एनर्जेटिक वाटते. चार पाउलं जास्त चालण्याची आपल्याला प्रेरणा मिळते. जर आपण आता सुरुवात करत असाल तर, पार्टनरसोबत असल्या कारणाने आपल्याला अस्ताव्यस्त वाटत नाही. समोरचा व्यक्ती त्याच्या अनुभवांवरून आपल्याला वॉकिंगचे फायदे आणि काही टिप्सही देऊ शकतो.

**वृद्ध लोकांनी मॉर्निंग वॉक करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात?-** रोजच्या चालण्याबरोबरच सुरक्षितताही महत्त्वाची आहे. वृद्ध व्यक्तींनी नेहमी जोडीदारासोबत फिरावे. यामुळे त्यांना सुरक्षित वाटेल आणि कोणालाही न घाबरता चालता येईल.

**आत्मविश्वास वाढतो**

मोकळ्या हवेत वॉक केल्याने आपल्याला शारीरिकदृष्ट्या चांगले वाटते. याचा आपल्याला मानसिक आरोग्यावरही सकारात्मक परिणाम होतो. जर आपण मित्र किंवा कुटुंबाच्या कोणत्या व्यक्तीसोबत वॉक करत असाल तर, त्यांच्यासोबत आपले बंध अधिक घट्ट होते. विचारांची देवाणघेवाण होते. काही लोक व्यायामाचा कंटाळा करतात. पण सोबत कोणी असेल तर, व्यायाम करण्याचा हुरूप वाढतो.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

पार्टनरसोबत वॉक करताना काही गोष्टींची काळजी घ्याला हवी. चालताना जास्त बोलणे टाळा. कारण यामुळे श्वासोच्छवासाचा त्रास होईल, आणि यामुळे आपल्याला थकवाही जाणवू शकतो. जास्त बोलल्याने आपले लक्ष विचलित होऊ शकते. तुम्हाला व्यायामातून मिळणारा फायदा शरीराला मिळणार नाही.


**एकटे चालणे**

तज्ज्ञांच्या मते, एकटे फिरणे अधिक फायदेशीर आहे. आपलं संपूर्ण लक्ष स्वतःकडे असते, आणि एकटे चालल्याने आपले लक्ष स्वतःच्या ग्रोथकडे असते.

# जागतिक पर्यटन दिनानिमित्त शुक्रवारी अमरावतीत विविध कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती-** संयुक्त राष्ट्र जागतिक पर्यटन संस्था या आंतरराष्ट्रीय पर्यटन संस्थेद्वारे घोषित दि.२७ सप्टेंबर यादिवशी दरवर्षी जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात येतो. या दिनाच्या औचित्याने आंतरराष्ट्रीय पर्यटन संस्थेद्वारे घोषवाक्य प्रसिद्ध करण्यात येते. यावर्षी जागतिक पर्यटन दिनाचे पर्यटन आणि शांतता हे घोषवाक्य घोषित करण्यात आले आहे.या जागतिक पर्यटन दिनानिमित्त दि. २७ सप्टेंबर, २०२४ ला सकाळी ६.०० ते १०.०० या वेळेत छत्री तलाव परिसरात ट्रेकिंग व पक्षी निरिक्षण आयोजित करण्यात आले आहे. तसेच श्री. विजय राऊत, प्राचार्य, ॲनिमेशन महाविद्यालय, अमरावती यांचे मार्फत




कॉलेज, अमरावती यांच्या वतीने पेपर शिल्प, कला प्रदर्शनीचे सकाळी १०.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. तसेच युवा पर्यटन क्लब, समाजकार्य पथनाट्याचे ईर्विन चौक, अमरावती येथे सकाळी ९.०० ते १०.०० या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आले आहे.तरी या उपक्रमांमध्ये स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्री.विजय अवधाने उपसंचालक,पर्यटन संचालनालय, प्रादेशिक कार्यालय, अमरावती यांनी केले आहे.

# शेतकरी, शेतमजूर यांना अनुदानावर मिळणार गाय, शेळी अन् मुरघास बॅग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती-** शेतकरी, शेतमजूर, पशुपालकांसाठी पशुसंवर्धन विभाग वेगवेगळ्या योजना राबवताना दिसत आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी नव्याने योजना जाहीर केल्या आहेत.

महामारी, दुष्काळ व विविध साथीच्या रोगातून पशुधनाच्या झालेल्या नुकसानीनंतर शेळ्या, गाय व चाऱ्यासाठी मुरघास बॅग आदी योजनेच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळणार आहे.

जिल्हा परिषद उपकर योजना व जिल्हा वार्षिक योजनेमधून वैयक्तिक लाभाच्या विविध योजनेतील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी साथीच्या रोगातून पशुधनाच्या झालेल्या नुकसानीनंतर शेळ्या, गाय व चाऱ्यासाठी मुरघास बॅग विविध योजना जाहीर केल्या असून, यासाठी २३ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करता येणार आहेत.पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखाना अथवा जिल्हा परिषदेच्यासंकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती माळशिरस तालुका पशुसंवर्धन विभागाने दिली आहे.



### या योजनांचा मिळणार लाभ

७५ टक्के अनुदानावर ४ शेळ्या व १ बोकड, ५० टक्के अनुदानावर मिल्किंग मशीन, ५० टक्के अनुदानावर मुरघास निर्मितीस प्रोत्साहन अंतर्गत मुरघास (सायलेज) बैंग, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ५० टक्के अनुदानावर सायलेज बॅग, खनिज मिश्रण वापरासाठी कमाल २ दुधाळ पशुधनासाठी ३३ टक्के अनुदान अशा योजनांसाठी शेतकरी व शेतमजुरांना अर्ज करता येणार आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २६ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# किरण पातूरकर म्हणतात आम्ही मित्र पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करणार नाही





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती,** भारतीय जनता पार्टीचे नेते माजी शहर अध्यक्ष आणि अमरावती विधानसभेचे इच्छुक सक्षम उमेदवार किरण पातुरकर यांनी भारतीय जनता पार्टी चे महाराष्ट्राचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून अमरावती विधानसभेची जागा ही भारतीय जनता पार्टी ने लढावी अशी आग्रही मागणी केली आहे.

अमरावती हे पश्चिम विदर्भाच मुख्यालय असून अमरावती विधानसभा ही सातत्याने भारतीय जनता पार्टी ने लढली असून ३ वेळा विजय प्राप्त केला. तसेच मागच्या महानगरपालिकेमधे भारतीय जनता पार्टी चे बहुमताने अमरावती महानगरपालिका ताब्यात घेतली होती. संघटनात्मक रित्या सुद्धा अमरावती शहरामधे भारतीयजनता पार्टी मजबूत आहे. त्यामुळे अमरावती विधानसभेची जागा ही भारतीय जनता पार्टी नेच लढावी यासाठी अमरावती भाजपा च्या कार्यकर्त्यांची आग्रहाची मागणी आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप उमेदवाराचा पराभव झाला अशा परीस्थितीत अमरावती विधानसभा युती मधे मित्र पक्षाला सोडली तर भारतीय जनता पार्टी चे संघटनात्मक व राजकीय स्तरावर नुकसान होऊ




शकते. बडनेरा विधानसभा मित्रपक्षाला, अमरावती विधानसभा मित्रपक्षाला, अमरावती विधानसभामित्रपक्षाला, त्यामुळे भारतीय जनता पार्टी मनपा निवडणुकीच्या हिशोबाने खूपच मागे पडेल असे भाजप च्या कार्यकर्त्या मधे चर्चा आहे.ज्या मित्रपक्षांनी लोकसभेत भाजपच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात काम करून भाजपच्या उमेदवाराचा पराभव केला. त्या मित्रपक्षाच्या उमेदवाराचे काम विधानसभेत आम्ही करणार नाही अशी भावना भारतीय के जनता पार्टी च्या कार्यकर्त्यांची आहे.

भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने अमरावती भाजपा चे नेते किरण पातुरकर यांनी महाराष्ट्र भाजपा चे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्आणि प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना पत्र लिहून कार्यकर्त्यांच्या भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.

# दुर्गा देवींच्या मूर्तींचे काम आता अंतिम टप्प्यात

## नवरात्रोत्सवात यावर्षी जिल्ह्यासाठी सुमारे ४ हजार दुर्गा देवीच्या मूर्ती



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती–** गणेशोत्सवानंतर सर्वांना नवरात्रोत्सवाचे वेध लागले आहे. दुर्गा देवीच्या मूर्तीवर कारागीर अखेरचा हात फिरवत असून, घरगुती देवी मूर्ती तयार झाल्या असून, मोठ्या दुर्गा मूर्तींचे काम अंतिम टप्प्यात आहे. ३ ऑक्टोबरपासून नवरात्रोत्सवास प्रारंभ होणार आहे. घटस्थापनेसह देवी मूर्तीची स्थापना करण्याची परंपरा असल्याने मूर्तिकारांकडून मूर्ती साकारण्याच्या कामास वेग आला . यंदा जिल्ह्यासाठी सुमारे ४ हजार दुर्गा देवींच्या मूर्ती तयार केल्या . तर अन्य जिल्ह्यासह राज्यात मूर्ती पाठवल्या आहेत. भाविक घरगुती मूर्ती स्थापने पेक्षा सार्वजनिक दुर्गा मंडळांमध्ये देवींची स्थापना करण्यात येत असल्याची माहिती शहरातील मूर्तिकार गजानन गुजरे यांनी दिली.

नवरात्री उत्सव साजरे करणाऱ्या सार्वजनिक मंडळांची संख्याही वाढली . जिल्ह्यात लहान– मोठे ३ हजारांवर दुर्गा मंडळे आहेत. त्यांच्याकडून देवी मूर्तींची मागणी आहे. घरगुती देवी मूर्ती तयार झाल्या आहेत. तर सार्वजनिक मंडळात स्थापन करण्यात येत असलेल्या मोठ्या मूर्तींचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या पाच ते सहा दिवसात त्यांचेही काम पूर्ण होणार आहे.

अवघे ९ दिवस शिल्लक राहिल्याने मूर्ती साकारण्यासह तयारीस वेग आला . १ फुटापासून १३ फुटापर्यंत देवी मूर्ती साकारल्या . यामध्ये सप्तशृंगी, दुर्गा, रेणुका, महालक्ष्मी, कालिका देवी, महिषासुर मर्दिनी अशा मुर्ती तयार केल्या .

दुर्गा देवीच्या मूर्तींची मागणी असून, त्यापाठोपाठ सप्तशृंगी देवीच्या मूर्तीस मागणी आहे. आठवडाभरावर येऊन ठेपलेल्या नवरात्रोत्सवाच्या तयारीला जोरदार सुरुवात झाली आहे. अमरावती शहराचे आराध्य दैवत असलेल्या अंबादेवी, एकवीरा देवी यांच्यासह कालिका माता मंदिरात रोषणाई सभा मंडपांच्या सजावटीचे काम वेगाने सुरू असून, शहराचे आकर्षण असलेला अंबादेवी मंदिर उत्सवाची तयारीही अंतिम टप्पात आली आहे.

या मंदिर परिसरात नऊ दिवस यात्रेचे स्वरूप राहते. त्यामुळे शहर पोलिसांकडून तसे नियोजन करण्यात करण्यात आले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना राबविण्यात येत आहे.

# भारतीय जनता पार्टी वरुडचा पंचायत समिती कार्यालयात ठिय्या आंदोलन

## लाभयार्थ्यांना वेठीस धरणाऱ्या गटविकास अधिकाऱ्याला निलंबित करा





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ वरुड :–** वरुड तालुक्यातील घरकुल, सामूहिक सिंचन विहीर व इतर लाभार्थी यांना वेठीस धरून यांचे आर्थिक नुकसान करणारे गटविकास अधिकारी श्री सतीश देशमुख यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करून नुकसानग्रस्त लाभार्थी यांचे पैसे खात्यावर टाकण्यात यावे यासाठी आज भारतीय जनता पार्टी वरुड च्या वतीने गटविकास अधिकारी यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री देशमुख यांचा निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले. राज्यसभा खासदार डॉ अनिल बोंडे यांनी मध्यस्थी केल्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले.

पंचायत समिति कार्यालय वरुड येथील गटविकास अधिकारी श्री सतीश देशमुख हे डीएससी सोबत घेऊन रजेवर गेलेले असल्यामुळे तालुक्यातील सामूहिक सिंचन विहीर व घरकुल लाभार्थी यांचे श्री सतीश देशमुख यांच्या हलगर्जीपणामुळे लाभार्थी यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे.

वरुड तालुक्यातील मोदी आवास योजनेचे एकूण १३७४ लाभार्थी ज्यांचे घरकुल मंजुरात देऊन जवळपास सर्वच लाभार्थी यांनी घरकुलचे कामे सुरू केलेले आहेत.

अश्या लाभार्थी यांचे शासनाकडून आलेले पैसे सुद्धा डी.एस.सी. नसल्यामुळे आहारीत करता आलेले नाही. घरकुल लाभार्थी यांनी उसनवारी करून घरकुलचे काम सुरू केले. पण गटविकास अधिकारी श्री सतीश देशमुख यांच्यामुळे घरकुल लाभार्थी यांचे पैसे परत गेले. सिंचन विहीरी २३–२४ मध्ये ५६२ मजुर झाल्या परंतु त्यामध्ये चुकिच्या अटी लाऊन शेतकयांना नाहक त्रास देऊन शेतक री लाभार्थी यांचे झीरो मस्टर मारून तसेच वळेवर मस्टरचे पैसे न मिळाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले.तसेच एप्रिल २०२४ पासुन सिंचन विहीरीचे ५५ प्रस्ताव पंचायत समिति येथे पडून आहे त्यानां अध्याप पर्यंत मंजुरी नाही व सर्व ग्राम पंचायत ला प्रस्ताव पाठवू नये अशा सुचना सचिवांना दिल्या मुळे प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये विहीरीचे प्रस्ताव पडुन ओह. पंचायत समिती महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी विभागाकडून शासनाकडे निधीचा प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर तो मंजुर सुध्दा झाला.

त्यानुसार आयुक्त कार्यालयाकडून १३ सप्टेंबर २०२४ रोजी ४५ लाख ४९ हजार ३३८, १७ सप्टेंबर २०२४ अनुक्रमे १ लाख ९८ हजार ४०० रुपये व २६ हजार १०४ रुपयांचा निधी पाठविण्यात आल्याचे ३ पत्र पंचायत समिती कार्यालयाला प्राप्त आहेत. त्यानुसार पंचायत समिती सप्टेंबर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गारंटी योजना विभागाने पंचायत समितीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत माहीती दिली परंतु पंचायत समितीला जबाबदार अधिकारीच नसल्यामुळे या पत्राबाबत कुणीही गांभिर्याने घेतले.

१३ ते १७ सप्टेंबर दरम्यान ४७ लाख ७३ हजार ८४२ रुपये प्राप्त झाल्यानंतर किमान १८ सप्टेंबरपासुन केव्हाही ही प्रक्रिया डीएससी मार्फत होणे गरजेचे होते परंतु गटविकास अधिकारी डीएससी सोबत घेवुन गेल्याने व त्यांनी कुणालाही पदभार न दिल्याने एक पैसाही वरुड तालुक्याच्या वाट्याला आला नाही, जिल्ह्यातील इतर पंचायत समित्यांनी तो निधी आपल्याकडे ऑनलाईन वळवुन घेतला आणि वरुड तालुक्यातील तब्बल ४७ लाख ७३ हजार ८४२ रुपयांचे नुकसान झाले आहे.फळबाग योजना २०२३–२४ मध्ये संत्रा व मोसंबीच्यश्र ३०० हेक्टर फळबाग योजना शेतकऱ्याच्या मंजूर झाला. एप्रिल २०२४ पासून एकाही शेतक–यांची फळबाग योजना मंजुर केल्या गेली नाही.

करिता वरुड तालुक्यातील घरकुल, सामूहिक सिंचन विहीर व इतर लाभार्थी यांना वेठीस धरून आर्थिक नुकसान करणारे गटविकास अधिकारी श्री सतीश देशमुख यांच्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करून नुकसानग्रस्त लाभार्थी यांचे पैसे सात दिवसाच्या आत खात्यावर टाकण्यात यावे, अन्यथा आहमी तालुक्यातील सर्व लाभार्थी पंचायत समिति कार्यालय समोर आत्मदहन करणार असल्याचा इशारा देण्यात आला.

यावेळी भाजपा मोर्शी विधानसभा निवडणूक प्रमुख मनोहर आंडे, जिल्हा उपाध्यक्ष सौ अर्चना मुरूमकर, गोपाल मालपे, इंद्रभूषण सोंडे, प्रवीण उर्फ शेशू मानकर, *निळकंठ मुरूमकर, सौ. रूपाली सोंडे,योगेश्वर खासबागे, जिल्हा संयोजक सोशल मिडिया प्रीतम अब्रुक, दीपक पवार, सौ. विद्या भूबंर, भाग्येश देशमुख, सौ. प्रतिभा महल्ले, सौ. अश्विनी खोडे, कैलाश निंभोरकर, रामकृष्ण कराळे, सचिन सव्वालाखे, नीलेश वसुले, यश देशमुख यांच्यासह शेकडो लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धक्कादायक! बिहारमध्ये ४९ जण बुडाले, ४१ जणांचा मृत्यू

## जितिया व्रतानिमित्त आंघोळ करताना अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. २६औरंगाबाद बिहार –** बिहारमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बुधवारी देशभरात जितिया व्रत पाळण्यात आला. यावेळी महिलांनी गंगेसह विविध नद्यांमध्ये स्नानही केले. मात्र, बुधवार बिहार कालचा दिवस वाईट गेला. जितिया सणानिमित्त गंगा नदीत स्नान करण्यासाठी गेलेल्या लोकांपैकी राज्यभरात ४९ जण बुडाले, त्यापैकी ४१ जणांचा मृत्यू झाला. औरंगाबाद जिल्ह्यात विविध ठिकाणी तलावात आंघोळ करताना दोन महिला आणि सहा मुलींसह आठ जणांचा मृत्यू झाला. ही घटना जिल्ह्यातील बरुण ब्लॉकच्या इथाट गावात आणि मदनपूर ब्लॉकच्या कुशा गावात घडली.

हे सर्व लोक जितिया सणाच्या पूजेपूर्वी तलावात आंघोळीसाठी गेल्याचे सांगण्यात आले. सारण जिल्ह्यातही आई आणि कुटुंबातील इतर सदस्यांसह आंघोळीसाठी गेलेल्या पाच मुलांचा बुडून मृत्यू झाला. या घटना वेगवेगळ्या भागातील आहेत. कैमूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत जितिया सणावर आंघोळ करताना नदी आणि तलावात बुडून पाच जणांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील रामगड पोलीस स्टेशन परिसरात एक घटना घडली. दुसरी घटना दुर्गावती पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कल्याणपूर गावातील, तिसरी घटना मोहनिया पोलीस



ठाण्याच्या हद्दीतील दादर गावातील आहे. चौथी घटना भभुआ ब्लॉकच्या रूपपूर गावातील आहे. रोहतास जिल्ह्यातील देहरी पाली पुलाजवळ सोन नदीत आंघोळ करताना १३ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. कल्याणपूर पोलीस स्टेशन हद्दीतील वृंदावन परसौनी येथे एका आई आणि मुलीसह इतर दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. जिल्ह्यातील कल्याणपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बुडून तीन मुलांचा मृत्यू झाला.बिहचा येथे मुलीला वाचवताना आणखी ३ जण बुडाले बिहटा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अमानाबाद हलकोरिया चक गावातील सोन नदीच्या घाटावर जितिया सणानिमित्त सोन नदीत आंघोळीसाठी गेलेल्या आईसह १४ वर्षीय मुलीचा बुधवारी सायंकाळी बुडून मृत्यू झाला. राजधानी पाटणा च्या. तर जवळच आंघोळ करत असलेल्या त्याच गावातील एक महिला आणि दोन मुलींनी त्याला वाचवण्यासाठी नदीच्या जोरदार प्रवाहात उडी घेतली. मात्र जोरदार प्रवाहामुळे मुलीसह चारही जण बुडाले. बुडाल्याची माहिती मिळताच परिसरात घबराट पसरली.

# राज्यात ‘महायुती’चीच सत्ता येणार : अमित शहा



## पश्चिम महाराष्ट्र जिंकण्याचा निर्धार; आवाडे पिता-पुत्रांचा भाजपमध्ये प्रवेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६कोल्हापूर**
संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत आपल्या ‘महायुती’चीच सत्ता येणार आहे. एवढेच नाही, तर भाजप हा सर्वात मोठा पक्ष असेल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बुधवारी व्यक्त केला. कार्यकर्त्यांनी नैराश्य झटकून कामाला लागावे, असा कानमंत्रही शहा यांनी यावेळी दिला. दरम्यान, इचलकरंजीचे ज्येष्ठ नेते आ. प्रकाश आवाडे यांनी पुत्र राहुल आवाडे यांच्यासह यावेळी भाजपमध्ये प्रवेश केला.

भारतीय जनता पक्षातर्फे आयोजित पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकार्यांच्या बैठकीत ते बोलत होते. विधानसभेला पश्चिम महाराष्ट्र जिंकण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यावेळी केंद्रीय पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कामगारमंत्री सुरेश खाडे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, खा. धनंजय महाडिक आदी प्रमुख उपस्थित होते.

केंद्रीय गृहमंत्री शहा म्हणाले, पश्चिम महाराष्ट्र हा काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार गटाचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र, या विधानसभा निवडणुकीनंतर पश्चिम महाराष्ट्र भाजपचा बालेकिल्ला ठरेल. त्यासाठी शरद पवार आणि कंपनीचा पराभव केला पाहिजे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे बूथ लेव्हलच्या नाराज कार्यकर्त्यांना हेरून त्यांना भाजपकडे वळवा. विरोधी पक्षांचे बूथ कमकुवत झाल्यास भाजप अधिक मजबूत होणार आहे.

शहा म्हणाले, लोकसभा निवडणुकीत भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही, त्यामुळे कार्यकर्ते नाराज आहेत. मात्र, जगात सलग तीन वेळा सत्ता आणि पंतप्रधानपद मिळविलेला पक्ष म्हणजे भाजप आणि नरेंद्र मोदी आहेत. राहुल गांधी यांच्या काँग्रेसला गेल्या तीन लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या एकूण जागांपेक्षा यंदाच्या निवडणुकीत भाजपला मिळालेल्या जागा जास्त आहेत, हे कार्यकर्त्यांनी विसरू नये. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी संविधानाबाबत केलेला खोटा प्रचार आता जनतेला समजला आहे. त्यामुळे जनतेमध्ये सकारात्मक बदल झाला आहे. काँग्रेसला कमी जागा मिळूनही राहुल गांधी विजयी झाल्याच्या आविर्भावात आहेत; मग आपण सत्ता मिळवूनही निराश का? असा सवाल शहा यांनी कार्यकर्त्यांना केला.

# दापोरी येथील जिल्हा परिषद शाळेचा ’आदर्श ’ अनोखा उपक्रम !

## मोर्शी तालुक्यातील एकमेव आदर्श शाळा !

### गावकरी व शिक्षकांच्या सामूहिक प्रयत्नातून शाळेचा कायापालट !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मोर्शी –** विद्यार्थ्यांना शिक्षण देणारी आदर्श शाळा कशी असावी असा प्रश्न पडल्यास अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील दापोरी येथील जिल्हा परिषदेची शाळा हि उत्तम उदाहरण ठरेल.या शाळेत शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना शाळेच्या व्यतिरिक्त वेळेतही शिक्षणाचे धडे दिले जातात. अल्पकालावधीतच शिक्षक व ग्रामस्थांच्या सामूहिक प्रयत्नाने या शाळेचा कायापालट झाला. त्यातूनच इंग्रजी माध्यमाच्या संस्कृतीकडे वळणारी पावले दापोरी येथील जिल्हा परिषद शाळेकडे वळू लागली .शिक्षनाच्या खालावलेल्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेची संस्कृती मोडकळीस निघत आहे. याला काही अपवादही आहेत. असाच अपवाद ठरली आहे मोर्शी तालुक्यातील दापोरी येथील जिल्हा परिषदेची शाळा.

दोन हजार सातशे लोकसंख्या असलेल्या दापोरी गावात १८ / १०/१८७९ मध्ये स्थापन झालेल्या जिल्हा परिषद शाळेला आज १४५ वर्षांचा कालावधी पूर्ण होत असून १४५ वर्षानंतर हजारो विद्यार्थी घडविणारी ही जिल्हा परिषद शाळा आपल्या कर्तुत्वाचा ठसा जिल्ह्यात उमटवितांना दिसत आहे.अमरावती जिल्ह्यात आजही काही जिल्हा परिषद शाळांची व इतर शासकीय शाळेप्रमाणाचे दयनीय अवस्था निर्दशनास येत आहे. मात्र दापोरी गावातील नागरिकांनी पालकांनी आपले पाल्य गावापासून दूरवर शहरातील शाळेत पाठविण्यासाठी नकार दिला आणि जिल्हा परिषद शाळेवर विश्वास दाखविला असून जिल्हा परिषद शाळा आदर्श बनविण्यासाठी गावकरी मुख्याध्यापक शिक्षक यानिमित्ताने एकत्र आले. त्यासाठी त्यांनी स्वत: जवळील पैसे गोळा केले. शिक्षकांच्या या विधायक कार्याला गावकऱ्यांनीही एकदिलाने साथ दिली व या कार्यात गावकऱ्यांनी व शिक्षकांनी अनमोल वाटा उचलला. त्या माध्यमातून शाळेचा कायापालट करण्यात आला. शाळेची रंगरंगोटी, भिंतीवरील बोलकी चित्र प्रदर्शनी विध्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे शिकवितांना दिसत आहे, शाळेमध्ये विविध रंगांची फुलझाडे, शाळेतील विध्यार्थ्यांना खेळाच्या सेवा सुविधा, स्वतंत्र अभ्यासिका, कॉम्प्युटर लॅब, विद्यार्थ्यांसाठी बँक, मुलभूत सोयीसुविधा करण्यासोबतच विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयुक्त अशा अत्याधुनिक यंत्रणा उभारण्यात आल्या. भौतिक सुविधांची व्यवस्था झाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी लक्ष्य केंद्रित करण्यात आले. मागील अनेक वर्षापासून या शाळेतील विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेमध्ये सुद्धा आपला ठसा उमटवीत असून या शाळेने जिल्हा क्रीडा सर्धेमध्ये अनेक मेडल प्राप्त करून खोखो , कबड्डी यासारख्या खेळामध्ये येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये आपली ओळख निर्माण केली आहे. यासाठी शिक्षकांनी पूर्ण वेळ शाळेसाठी देऊन विद्यार्थ्यांना ज्ञानदान देण्याचे अनमोल कार्य करतांना दिसत आहे .या शाळेमध्ये विध्यार्थ्यांकरिता वर्षभर वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवून शिक्षणाचे धडे दिले जातात.या जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत या खासगी शाळेप्रमाणे या जिल्हा परिषद शाळेवर देखील 'हाऊसफुल्ल'चा फलक लावल्या जाऊ शकतो. सहा शिक्षकांचे परिश्रम आणि त्याला गावकऱ्यांची मिळालेली साथ यामुळे एका वर्षात या शाळेच रूपडं पालटलं. शाळेचे मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक यांच्यासह ग्राम पंचायत, शाळा व्यवस्थापन समितीने शाळेत व्यापक परिवर्तन आणण्याचा निर्धार केला. या शिक्षकांनी स्वत: मेहनत करून शाळेला एक नव रूप दिले. गावकऱ्यांनी सकारात्मक पाउल उचलत शिक्षकांच्या या उपक्रमाला सहकार्य केले व गावातील शाळेला आदर्श बनविण्यास सहकार्य केले.




गावकऱ्यांनी व शिक्षकांनी एकत्र येत शाळेत परिवर्तन घडवण्याला सुरुवात केली. गावकऱ्यांची अनमोल साथ मिळाली, त्यामुळे हे शक्य झाले. शाळेतील विद्यार्थ्यांना हसत खेळत दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सर्वसुविधा पुरवण्याचा आम्ही सर्व शिक्षक प्रयत्न करीत आहे --
– **गजानन चौधरी** मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा दापोरी

### जिल्ह्यातील शाळांमध्ये असा आदर्श ’पॅटर्न ’ राबवावा

दापोरी येथील जिल्हा परिषद शाळा इतरांसाठी प्रेरणादायी ठरत असून, या शाळेचा पॅटर्न अन्य जिल्हा परिषद शाळेत राबविण्याचा निर्धार अमरावती जिल्हा परिषद प्रशासनाने करायला हवा. दापोरी जिल्हा परिषद शाळेत अनोखे उपक्रम राबविल्याने आणि शाळेत आवश्यक त्या सर्व भौतिक सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थी आनंदाने हसत खेळत शिक्षण घेतांना दिसत. दापोरी येथील शाळेचा हा उपक्रम जिल्हयातील अन्य जिल्हा परिषद शाळांनी राबविल्यास जिल्हा परिषद शाळांवर पालकांचा विश्वास बसेल अशी अपेक्षा आहे -- **रुपेश वाळके** ग्राम पंचायत सदस्य.

शाळेची पटसंख्या दापोरी जिल्हा परिषद शाळेची नावलौकिकता वाढल्यामुळे आता पटसंख्या ही तब्बल १७८ च्या पुढे गेली आहे. जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेमध्ये असा उपक्रम राबविल्यास एखाद्या नामांकित

# अमरावतीत २९ रोजी तेली समाज राज्यस्तरीय परिचय मेळावा

## श्री संताजी समाज विकास संस्थेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–** तेली समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आणि सामाजिक उपक्रम राबवित समाजपयोगी कार्यात अग्रेसर असलेल्या श्री संताजी समाज विकास संस्थेतर्फे अनेक उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमांचा एक भाग म्हणून येत्या २९ सप्टेंबर रोजी अमरावतीत सर्व शाखीय तेली समाजातील उपवर-वधू व पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे . पंचवटी चौक स्थित पीडीएमसीच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल सभागृहात आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन रविवार २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता राज्याचे माजी मंत्री व तेली समाजाचे राष्ट्रीय नेते जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते होणार आहे. श्री संताजी समाज विकास संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय आसोले यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या राज्यस्तरीय मेळाव्यास नागपूर पदवीधर मतदारसंघाचे आमदार अभिजीत वंजारी ,अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे, नागपूर येथील सामाजिक कार्यकर्ते किशोर कन्हेरे ,माजी खासदार सुरेश वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सोबतच माजी आमदार राजू तिमांडे ,माजी महापौर विलास इंगोले, माजी खासदार अनंत गुढे ,सतीश देऊळकर नागपूर, माजी महापौर अशोक डोंगरे , दामोदरराव मोगरकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. या मेळाव्यात तेली समाजाचे भूषण ,प्रसिद्ध साहित्यिक दिल्ली येथील लक्ष्मणराव शिरभाते चहावाले यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. या राज्यस्तरीय परिचय मेळाव्यास राज्यातील वर्धा ,नागपूर ,चंद्रपूर ,यवतमाळ, मेहकर ,भंडारा ,मुंबई, पुणे ,कोल्हापूर, जळगाव ,नाशिक याबरोबरच मध्यप्रदेश व छत्तीसगढ राज्यातील तेली समाज बांधव सहभागी होणार असून या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष प्रा. संजय आसोले ,उपाध्यक्ष मिलिंद शिरभाते, नंदकिशोर शिरभाते ,कोषाध्यक्ष प्रा .डॉ. अनुप शिरभाते, सचिव प्रा. सुनील जयसिंगपूरे व कार्यकारणी सदस्य प्रा. डॉ. प्रकाश पजगाडे ,डॉ. विजय अजमिरे ,आशिष आगरकर, विलास शिरभाते हे परिश्रम घेत आहे . सदर मेळाव्यास तेली समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संताजी समाज विकास संस्थेतर्फे करण्यात आले आहे.




### विवाहबंधन विशेषांकाचे होणार विमोचन

तेली समाज राज्यस्तरीय उपवर वधू व पालक परिचय मेळाव्याचे निमित्ताने सर्व उपवर- वधू यांची सचित्र माहिती असलेला विवाहबंधन हा विशेषांक प्रकाशित करण्यात येणार आहे . मेळाव्यात या विशेषांकाचे विमोचन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून यावर्षी या विशेष अंकांमध्ये तब्बल ८०० विवाहयोग्य मुला मुलींची सचित्र माहिती असल्याचे प्राध्यापक संजय आसोले यांनी सांगितले.


# छायाचित्रकारांच्या हक्काचे व्यासपीठ सोहळा मैत्रीचा

## अमरावती जिल्ह्यातूनही अनेक छायाचित्रकार होणार सामील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–** चार वर्षांपूर्वी चार-पाच मित्र एकत्र येऊन सोहळा मैत्रीचा क्षण आठवणीचे हा एक आगळावेगळा कार्यक्रम सुरू करण्यात आला. आज हा कार्यक्रम भारतभरातील छायाचित्रकारांचे हक्काचे व्यासपीठ बनला आहे. जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील चारठाणा येथील श्री क्षेत्र भवानी मंदिर येथे या वर्षीही रविवार २९ सप्टेंबर रोजी हा कार्यक्रम पार पडणार आहे, ज्याला अमरावती जिल्ह्यातून अनेक छायाचित्रकार उपस्थित राहणार आहे.या कार्यक्रमाला पहिल्या वर्षी जवळपास १ हजार फोटोग्राफर व्हिडिओ ग्राफर बंधू भगिनी यांची उपस्थिती होती. नेमका हा कार्यक्रम कशासाठी घेतल्या जातो, यामागील उद्देश समजून महाराष्ट्रातील फोटोग्राफर व्हिडिओग्राफर यांनी सोहळा मैत्रीचा हा कार्यक्रम जणू डोक्यावर घेतला. फक्त व्हाट्सअप डिझाईन तयार करून ती फोटोग्राफरच्या ग्रुप वर व्हाट्सअप च्या माध्यमातून इंस्टाग्राम च्या माध्यमातून फेसबुकच्या माध्यमातून फोटोग्राफर-व्हिडिओग्राफरपर्यंत पोहोचविल्या जाते. कुठलेही आग्रहाचे निमंत्रण न देता या एका छोट्या सोशल मीडियाच्या माध्यमातून या कार्यक्रमाला गेल्या चार वर्षात महाराष्ट्र मध्य प्रदेश, दिल्ली, हरियाणा, यासह अनेक राज्यातून या कार्यक्रमाला फोटोग्राफर, व्हिडिओ ग्राफर जवळपास पंधरा ते वीस हजार उपस्थित दर्शवितात.जास्तीत जास्त फोटोग्राफर, व्हिडीओग्राफरने या सोहळ्याला उपस्थिती राखावी असे आवाहन मनीष जगताप फोटोग्राफर अमरावती यांनी केले आहे.




# कत्तलीकरिता बांधून ठेवलेल्या जनावरांना दिले जीवदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–:** कत्तलीकरिता बांधून ठेवलेल्या १२ जनावरांना नागपुरीगेट पोलिसांनी ताब्यात घेऊन गौरक्षणमध्ये पाठविले. याप्रकरणी रैफाज कुरेशी (वय ३० रा. तमेला ग्राउड) याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.नागपुरी गेट ठाण्यात रैफाज विरुध्द जनावरांची कत्तल केल्याचा आधीच एक गुन्हा दाखल आहे. त्या गुन्ह्यात तो अद्यापही अटक न झाल्यामुळे मंगळवारी नागपुरी गेट पोलीस रैफाजच्या शोधात त्याच्या घरी गेले असता तो घरात मिळून आला नाही. त्यामुळे त्यांनी घराची व घराच्या बाजूला असलेल्या गोठ्याची पाहणी केली असता गोठ्यात १२ जनावरे निर्दयतेने बांधलेली दिसताच पोलिसांनी घरच्यांची विचारपुस केली. त्यांनी उडवाउडविची उत्तरे दिली. तसेच जनावरे कुठून आणले याबाबत समाधानकारक उत्तर न दिल्यामुळे पोलिसांनी जनावरे ताब्यात घेऊन सुरक्षित गौरक्षणमध्ये पाठविले आणि रैफाजविरुध्द गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरु केला.

# ग्रामीण गुन्हे शाखा पथकाच्या दोन ठिकाणी धाडी

## ३.१८ लाखांचा गुटखा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती** ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी सायंकाळी शिरजगाव व माहुली पोलीस ठाण्याच्या हद्दीत धाडी घालून ३ लाख १८ हजार ८८० रुपयांचा गुटखा जप्त केला. याप्रकरणी विनायक अशोकराव काळे (रा. शिरजगाव कसबा) आणि अबदुल रऊफ मोहम्मद युरूफ (वय ६० रा. माहुली) या दोघांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस विभागामार्फत अवैध

गुटखा विक्री करणाऱ्यांवर शहरात धडक कारवाई सुरु आहे. तसेच ग्रामीण पोलीस दलानेसुध्दा अवैध गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई सुरु केली आहे. गुटखा विक्रेत्यांची माहिती घेत ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने मंगळवारी सायंकाळी शिरजगाव कसबा येथील विनायक काळे यांच्या दुकानाच्या बाजुला असलेल्या गोदामाची पाहणी केली असता त्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचा २ लाख ६ हजार ४०० रुपयांचा गुटखा मिळून आला. परंतु काळे हा पळून गेल्यामुळे पोलीसत्याच्या शोधात आहेत. त्यानंतर यापथकाने माहुली येथील रहिवाशी अब्दुल रऊफ यांच्या घरी धाड घातली असता त्यांच्या घरात १ लाख १२ हजार ४८० रुपयांचा गुटखा मिळाला. याप्रकरणी रऊफ याला अटक करण्यात आली. तसेच दोन्ही प्रकरणात वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले. सदरच्या कारवाईत गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक गजानन वाघ, महेंद्र गवई, सचिन पवार, पोलीस उपनिरीक्षक नितीन चुलपार, अंमलदार युवराज मानमोडे यांच्या समावेश होता.

# तडजोडीसाठी साडे तेरा हजार ग्राहकांना महावितरणची नोटीस

## राष्ट्रीय लोक अदालत मध्ये सहभागी होण्याचे आवाहन, व्याज आणि विलंब आकार होणार माफ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती** वीज बिल थकल्यामुळे मार्च २०२४ पुर्वी कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या जिल्ह्यातील १३ हजार ५८३ वीज ग्राहकांनी जिल्ह्यात होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालत मध्ये सहभाग नोंदवून तडजोडीने वाद मिटवावा आणि महावितरणच्या व्याज आणि विलंब आकाराच्या माफीचा लाभ घ्यावा असे आवाहन अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी केले आहे.

जिल्हा तथा तालुका विधी सेवा प्राधिकरणाकडून (शनिवार २८ सप्टेंबर) जिल्हा आणि तालुकास्तरीय दिवानी आणि फौजदारी न्यायालयात आयोजित लोक अदालत मध्ये महावितरणने दाखलपूर्व असलेली आणि कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेली १३ हजार ५८३ प्रकरणे २८ कोटी ९७ लाख रूपयाच्या तडजोडीसाठी ठेवली आहे. ग्राहकांना याचा लाभ घेता यावा यासाठी अधीक्षक अभियंता यांच्या मार्गदर्शनात जिल्ह्याच्या विधी विभागाकडून या सर्व ग्राहकांना नोटीस देण्यात आली आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीत सहभाग नोंदविणाऱ्या महावितरणच्या लघुदाब आणि उच्चदाब ग्राहकांना महावितरण अभय योजना २०२४ च्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १००% मुद्दल रक्कम भरणाऱ्या थकबाकीदार ग्राहकांना व्याज आणि विलंब आकाराची माफी मिळणार आहे. सोबत वीज पुरवठा खंडित करण्यात आलेल्या तारखेपासून तर अर्जाच्या तारखेपर्यंत कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. याशिवाय थकबाकीदार ग्राहकांने मुद्दल रक्कम एकरकमी भरल्यास उच्चदाब वर्गवारितील ग्राहकांना ५% आणि लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांना १०% अतीरिक्त सवलतीचे प्रावधान आहे. याशिवाय ३०% डाऊन पेमेंट भरून उर्वरित मुद्दल थकबाकी ६ हप्त्यात भरण्याचे प्रावधानही करण्यात आले आहेत. याशिवाय मार्च २०२४ पूर्वी वीज पुरवठा खंडित असलेल्या आणि लोकअदालतीची नोटीस न मिळालेल्या वीज ग्राहकांनाही महावितरणची अभय योजना २०२४ लागू असून त्यांनी आपली थकबाकी महावितरणची कार्यालये तसेच महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर जाऊन भरण्याची सोय देखील करण्यात आलेली आहे.




महावितरणकडून नोटीस पाठविण्यात आलेल्या ग्राहकांमध्ये ४२९० ग्राहक हे अमरावती ग्रामीण विभागातील असून त्यानंतर अचलपूर विभागातील ४०९९ ग्राहकाचा समावेश आहे. अमरावती शहरात नोटीस पाठविण्यात आलेल्या ग्राहकाची संख्या २५५६ आणि मोर्शी विभागात ती २६३८ आहे.

# बाभळीच्या झाडावर रात्रभर अडकून वाचविला जीव



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ धामणगाव

देव तारी त्याला कोण मारी विष्णोरा येथील हरिदास लोखंडे हे बुधवार रोजी रात्री आठ वाजता काटपुर येथे अवधुती भजनाकरिता गेले होते रात्री बारा वाजता भजन संपल्यानंतर घरी परत येत असताना मध्यरात्री मुसळधार पाऊस आल्याने धामणगाव येथील नाल्याला पूर आला होता त्या नाल्याच्या पुलावरून येत असताना पुलावरील खड्ड्यात दुचाकी घसरून हरिदास लोखंडे हे दुचाकीसह पुरामध्ये वाहून गेले काही अंतरावर बाभळीच्या झाडाला ते अडकले व रात्रभर त्यांनी त्या झाडाचा सहारा घेऊन आपला जीव वाचवला व सकाळी पाच वाजताच्या दरम्यान धामणगाव येथील काही नागरिकांनी माणुसकीचा परिचय देत पुरामध्ये अडकलेल्या हरिदास लोखंडे यांना बाहेर काढले.

# लोकनेते दिवंगत संजयभाऊ बंड (माजी आमदार) अभिवादन सोहळा तथा प्रा. श्याम मानव यांची प्रबोधन सभा



विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती

लोकनेते दिवंगत संजयभाऊ बंड (माजी आमदार) यांच्या जयंती निमित्त अभिवादन सोहळ्याचे आयोजन दि. २७ सप्टेंबर २०२४ रोजी ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे सायं. ६ वा. आयोजित करण्यात आलेले असुन त्यानिमित्याने महाराष्ट्र बचाओ-संविधान बचाओ अभियान अंतर्गत प्रा. श्याम मानव, संस्थापक संघटक, अ.भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती तथा ज्येष्ठ राजकिय विश्लेषक यांचे प्रबोधनपर व्याख्यान होणार आहे. या सभेमध्ये प्रा. श्याम मानव, भारतीय संविधानाला असलेले धोके, देशा समोर असलेली मोठी संकटे आपल्या पुढच्या पिढीला किती अंधारात नेत आहे. देशासोबतच राज्याची राजकीय स्थिती कशी. समाजात शेतकरी, युवक, बेरोजगारी, महागाई, शिक्षण व आरोग्याची स्थिती काय आहे या सर्व बाबींचा अभ्यास पूर्ण विवेचन म्हणून या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी लहान मोठ्या थोरांनी तसेच विद्यार्थी व्याख्यानाची पर्वनी न चुकता लोकशाही अबाधीत ठेवण्यासाठी या व्याख्यानाकरिता उपस्थित रहावे, ही विनंती.असे आवाहन लोकनेते दी. संजयभाऊ बंड मित्र परिवारातर्फे करण्यात आली आहे. तसेच आयोजनकांनी कार्यक्रम ठिक वेळेवर सुरु होईल असे सांगितले. महिलांसाठी विशेष बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

# मेळघाट मधील अरुंद रस्ते मोठे करण्याच्या मागणी साठी ३० सप्टें.ला चक्काजाम आंदोलन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

मेळघाटातील घाटवळणातील रस्ते रुंदीकरण आणि इंग्रजकालीन पुलांचे नूतनीकरण या मुद्द्यावर मेळघाटवासी एकत्र झाले आहेत. मंगळवारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात सर्वपक्षीय बैठक झाली. त्यानुसार येत्या ३० सप्टेंबर रोजी चक्काजामने आंदोलनाला प्रारंभ करण्याचा इशारा प्रशासनाला देण्यात आला आहे.

उपविभागीय अधिकारी प्रियंवदा महाडदडकर आणि धारणी पोलीस ठाण्याला या मुद्द्यावर दिलेल्या निवेदनानुसार, सोमवारी सकाळी घडलेल्या सेमाडोह येथील अपघातासाठी नागमोडी वळणातील अरुंद रस्ते आणि लहान इंग्रजकालीन पूल जबाबदार आहेत.

या रस्त्याचे नूतनीकरणाचे काम वनविभागाच्या आडकाठीने थांबले. यामुळे घटांग ते सेमाडोहपर्यंत अनेक वेळा दुचाकी, चारचाकी आणि एसटी व खासगी बस कडेला कलंडल्या. अपघातात अनेकांनी आपले प्राण गमावलेले आहेत. अशा परिस्थितीत रस्त्याचे रुंदीकरण व्हावे आणिप्रवाशांचे जीव वाचविण्यात यावे, यासाठी मेळघाटवासी एकत्र आले आहेत.माजी आमदार केवलराम काळे, श्रीपाल पाल, शिवसेनेचे शैलेश मालवीय, ॲड. शैलेंद्रसिंह ठाकूर, डॉ. शैलेश जिराफे, युगंधर सोनोने, सचिन उपाध्याय, रोहित पाल, हिरालाल मावसकर, रामगोपाल मावसकर आदी बैठकीला उपस्थित होते.

# उद्या होणारी दर्यापूर जिनिंग प्रोसिंगची आमसभा रद्द करा - मनसे ची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६दर्यापूर

मालमत्ता विक्रीच्या कारणावरून आधीच वादग्रस्त ठरलेल्या दर्यापूर शेतकरी सहकारी जिनिंग-प्रेसिंगची वार्षिक आमसभा दर्यापूरपासून अंतरावर असलेल्या आमला येथे अध्यक्षांच्या घरी घेण्यात येत आहे. त्याला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने विरोध दर्शविला असून भागधारकांना माहिती होऊ न देता संस्थेची करोडो रुपयांची मालमत्ता विक्री करण्यासाठी आमसभा लपूनछपून घेण्यात येत असल्याचा आरोप केला आहे.

आमला येथे २७ सप्टेंबर रोजी घेण्यात येत असलेली वार्षिक आमसभा रद्द करावी आणि संस्थेच्या प्रत्येक भागधारकाला रीतसर नोटीस व वृत्तपत्रात प्रकाशित करूनच आमसभा घेण्यात यावी, अशी मागणी मनसेने सहायक निबंधकांना दिलेल्या निवेदनातून केली. त्यानुसार, मागील महिन्यात जिनिंग प्रेसिंगच्या शिवर रोडवरील भूखंडविक्रीचा लिलाव करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी लिलावस्थळी जाऊन तो प्रयत्न हाणून पाडला.

संचालक मंडळाच्या घरी जाऊन गुपचूप आमसभेच्या नोटीसवर सह्या घेण्यात आल्या, पण भागधारकांना याविषयी माहिती देण्यात आली नाही. संस्थेमध्ये एकूण सहा हजार भागधारक होते.परंतु, कोणतीही नोटीस व कारण नसताना व्यवस्थापक व विद्यमान सत्ताधारी मंडळींनी भागभांडवलदारांचे मतदार यादीतून नाव कमी करून नातेवाईक व मित्रमंडळी यांना भागभांडवलदार करून सदर निवडणूक प्रतिष्ठेची बनवली होती. संस्थेची शेवटची शिल्लक असलेली शिवर रोडवरील १ हेक्टर ८२ आर जमीन विक्री करून आर्थिक फायदा करून घ्यायचा, यासाठी हा अट्टाहास असल्याची चर्चा आता होत आहे. विद्यमान खासदार संस्थेत भागधारक आहेत. त्यांनी या प्रकरणाकडे लक्ष द्यावे, अशी मागणी मनसे तालुका अध्यक्ष मनोज तायडे यांनी केली आहे.

# कृषी खतांचे नमुने अप्रमाणिक; जिल्ह्यातील ५४ परवाने रद्द तर २४ निलंबित : कृषी विभागाची दबंग कारवाई



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, रासायनिक खते मिळावीत व याद्वारे उत्पन्नात वाढ व्हावी, यासाठी कृषी विभागाच्या पथकांद्वारा वेळोवेळी कृषी सेवा केंद्रातील बियाणे, खते व कीटकनाशकांचे नमुने घेण्यात येतात. यामध्ये नमुने अप्रमाणित व नियमांचे उल्लंघन, तसेच अनियमितता आढळल्याने या हंगामात ५४ कृषी केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत.याशिवाय २४ परवाने निलंबित करण्यात आले, तर १४ परवान्यांना ताकीद देण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी दिली. यामध्ये बियाणांचे १६ नमुने रद्द, तर ८ मध्ये निलंबन व ५ मध्ये ताकीद देण्यात आली. रासायनिक खतांमध्ये २३ परवाने रद्द १० निलंबित व ८ प्रकरणी ताकीद देण्यात आली, तर कीटकनाशकांचे १५ परवाने रद्द. ६ व निलंबित, तर १ प्रकरणात ताकीद देण्यात आल्याचे 'स्मार्ट' प्रकल्पाचे नोडल अधिकारी तथा उपसंचालक उज्ज्वल आगरकर यांनी सांगितले.

शेतीच्या उत्पादनात प्रमाणित व दर्जेदार बियाणे व खतांचे मोठे महत्त्व आहे. यावरच शेतकऱ्यांचा पिकांचे भविष्य अवलंबून असते. बियाणे खराब निघाल्यास पूर्ण हंगामच वाया जातो. त्यामुळे या कृषी निविष्ठांचे नियमित नमुने कृषी विभागाद्वारा घेण्यात येतातव प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येतात, यामध्ये नमुना सदोष असल्यास परवानाधारक व उत्पादक यांना नोटीस बजावण्यात येऊन आवश्यक ती कारवाई करण्यात येते. नमुना अप्रमाणित आल्यानंतर संबंधित परवानाधारकाला नोटीस बजाविण्यात येते. त्यानंतर सुनावणी व त्यानंतर आवश्यक कारवाई करण्यात येत असल्याचे कृषी विभागाने सांगितले.

# तळवेल येथे जिल्हास्तरीय खो खो स्पर्धा उत्साहात संपन्न

## मुलांमध्ये चांदुरबाजार तर मुलींमध्ये अचलपूर तालुका अव्वल



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६ तळवेल

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शंकर विद्यालय व शेषस्मृती क्रीडा मंडळ यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय खो खो स्पर्धाचे आयोजन तळवेल येथे मोठया उत्साहात संपन्न झाले.या स्पर्धाचे उदघाटन श्री बाबाराव सार्वजनिक शिक्षण संस्थेचे अध्यक्षराजाभाऊ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणुन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयच्या क्रीडा अधिकारी त्रिवेणी बानते, संस्थेचे सचिव नरेंद्रराव देशमुख, क्रीडा मंडळाचे उपाध्यक्ष वैकुंठराव वानखडे, तालुका क्रीडा शिक्षक संघटनेचे शरद नवले, पंकज उईके ,बबलूभाऊ देशमुख ,शैलेश गावंडे प्रवीण मोहोड ,डी आर नांदुरकर गोविंदराव चौधरी मनीष नागले निलेश बावणथडे आदी प्रामुख्याने उपस्तित होते.यावेळी मुलांच्या गटात १४ वर्षाआतील आदर्श विद्यालय जवळा शहापूर,१७ वर्ष गटात शंकर विद्यालय तळवेल,१९ वर्ष गटात खल्लार हायस्कुल खल्लार चा संघ विजयी झाला.मुलींच्या गटात १४ व १७ मध्ये आदर्श विद्यालय भुगांव,१९ गटात सिद्धार्थ हायस्कुल परतवाडा हे संघ विजयी होऊन विभागीय स्तरावर पात्र झाले.सर्व विजयी संघांना माऊली स्पोर्ट कडून सन्मानचिन्ह वितरित करण्यात आले.कार्यक्रमचे संचलन स्पर्धा संयोजक डॉ तुषार देशमुख प्रास्ताविक मुख्याध्यापक डी बी वानखडे तर आभार प्रिया देशमुख यांनी मानले.स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी शेषस्मृती क्रीडा मंडळ च्या खेळाडू व गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

# २२ वर्षांचा तरुण बनला या सिझनचा पहिला करोडपती, तुम्हाला येईल का हे उत्तर?



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई

सुपस्टार अमिताभ बच्चन होस्ट असलेल्या 'कौन बनेगा करोडपती' च्या या सिझनला पहिला करोडपती मिळाला आहे. जम्मू काश्मीरमधील चंदर प्रकाश हा २२ वर्षांचा तरुण या सिझनमधील पहिला करोडपती आहे. या भागाचा प्रोमो नं प्रोमो प्रदर्शित केला आहे. त्यामध्ये चंदरला अमिताभ बच्चन मिठी मारताना दिसत आहेत.

चंदरनं एक कोटींच्या प्रश्नाला शांतपणे आणि आत्मविश्वासानं उत्तर दिलं. चंदरला अमिताभ बच्चन यांनी भूगोला या विषयाशी संबंधित प्रश्न १ कोटींसाठी विचारला होता. तो प्रश्न होता, 'कोणत्या देशाचं सर्वात मोठं शहर त्याची राजधानी नाही पण, एक बंदर आहे. त्याचा अरबी अर्थ शांती निवास होतो. या प्रश्नाच्या उत्तरासाठी पर्याय होते ए) सोमालिया, बी) ओमान, सी)टांझानिया, डी) ब्रुनेई चंदरनं बराच विचार करुन या प्रश्नासाठी 'डबल डिप' या लाईफलाईनचा वापर केला. त्यानंतर त्यानं सी)टांझानिया हे उत्तर अमिताभ बच्चन यांना लॉक करण्यास सांगितलं. ते उत्तर बरोबर होतं. त्यामुळे चंदर १६ व्या सिझनमधील पहिला करोडपती बनला.१ कोटीसाठी विचारण्यात आलेल्या प्रश्नाचं बरोबर उत्तर दिल्यानंतर चंदरला अमिताभ बच्चन यांनी ७ कोटीसाठी प्रश्न विचारला. 'उत्तर अमेरिकामध्ये १८५७ साली इंग्रज आई-वडिलांपासून जन्मलेला पहिलं नोंदणीकृत मूल कोणतं होतं? चंदरला या प्रश्नाचं उत्तर माहिती नव्हतं. तसंच त्याच्या सर्व लाईफ लाईन संपल्या होत्या. त्यामुळे त्यानं खेळ सोडण्याचा निर्णय घेतला.

# 'समृद्धी'वर मिळतात भजी अन् बिस्किटे

## मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाच्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला कानपिचक्या



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नागपूर

समृद्धी महामार्गावर अद्याप चांगली उपाहारगृहे उपलब्ध करून देण्यात आली नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना पेट्रोलपंप परिसरात मिळतील ते पदार्थ खावे लागतात. बुधवारी मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठानेही समृद्धी महामार्गावर केवळ भजी अन् बिस्किटेच मिळतात, असे निरीक्षण नोंदवत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला कानपिचक्या दिल्या.

समृद्धीवर आवश्यक ठिकाणी चांगली उपाहारगृहे, प्रसाधनगृहे, वाहन दुरुस्ती केंद्रे इत्यादी सुविधा उपलब्ध व्हाव्या, याकरिता सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यावर न्यायमूर्तिद्वय भारती डांगरे व अभय मंत्री यांच्यासमक्ष सुनावणी झाली.

वाहनचालकांनी घरातूनच खाद्यपदार्थ घेऊन प्रवास करावा, अशी अपेक्षा केली जाऊ शकत नाही. त्यामुळे चांगली उपाहारगृहे सुरू करणे आवश्यक आहे. याशिवाय, या महामार्गावरील प्रसाधनगृहांची नियमित स्वच्छता होत नसल्याने घाण व दुर्गंधी पसरली असते, असेदेखील न्यायालयाने नमूद करून रस्ते महामंडळावर नाराजी व्यक्त केली.

# शिक्षणासोबतच इतर शैक्षणिक कार्यातही विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा : कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात 'फिजिक्स क्लब'चे उद्घाटन

विदर्भ प्रजासत्ताक
दि. २६ अमरावती

शिक्षण घेत असतांना इतर शैक्षणिक कार्यातही विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, जेणेकरुन त्याचेही ज्ञान मिळविता येईल, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील भौतकिशास्त्र विभागात फिजिक्स क्लब चे नुकतेच उद्घाटन झाले, त्याप्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरण-२०२० च्या सुकाणू समितीचे सदस्य, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय संचालक (अमरावती विभाग) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे डॉ. एफ. सी. रघुवंशी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, डॉ. जी.जी. मुळे, भौतिकशास्त्र क्लबचा अध्यक्ष एम. एस. सी. भाग २ चा विद्यार्थी राज पारखी उपस्थित होते.

प्रमुख अतिथी डॉ. एफ. सी. रघुवंशी मार्गदर्शन करतांना म्हणाले, विद्यार्थ्यांनी जीवन जगत असतांना आपण केलेली कामे भविष्यात मोठी उपयोगी पडतात. नवीन शैक्षणिक धोरणाबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर भविष्यात कोणकोणत्या संधी उपलब्ध होऊ शकतात, याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी विभागातून नेट/ सेट / गेट उतीर्ण, मेरिट व सुवर्ण पदके प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन तसेच क्लबच्या सर्व सदस्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थी समिती गठित करणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे, प्रश्नमंजुषा स्पर्धा, विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. सुरज तायडे यांनी विद्यार्थी समितीच्या सदस्यांच्या नावाची घोषणा केली. विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक राज पारखी, सूत्रसंचालन विवेक येवले व कु. मानसी खिराडे यांनी, तर आभार डॉ. जी. जी. मुळे यांनी मानले.

प्रश्न मंजुषा स्पर्धेमध्ये श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळविला. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. संदीप वाघुळे, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. स्वाती शेरेकर यांची उपस्थिती होती. स्पर्धेचे संचालन आदित्य प्रधान व कु. प्रणाली तायडे यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध गीत, कथा, कविता सादर केल्या. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगे बाबा यांचे प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाला विभागातील शिक्षकवृंद प्रा. अक्षय बांगर, प्रा. सुरज तायडे, प्रा. कु. श्वेता वाघमारे, प्रा. अभिषेक धलस्कर, प्रा. प्रियांका गोळे उपस्थित होते.

# १४२० कोटी रूपयांतून दर्जेदार विकासकामे होणार - उपमुख्यमंत्री अजित पवार

## विविध विकासकामांचे लोकार्पण, भूमिपूजन : वाढीव कराबाबत ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही









**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती,**

अमरावती शहर आणि परिसराच्या विकासासाठी भरघोस निधी देण्यात आला आहे. यातून शहराच्या वैभवात भर पडणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण होतील. एकाच दिवशी १४२० कोटी रूपयांच्या कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले आहे. ही कामे दर्जेदार होण्यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

जिल्हा नियोजनच्या सभागृहात आज विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार सुलभा खोडके, विभागीय आयुक्त डॉ. निधि पाण्डेय, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, अतिरिक्त जिल्हाधिकारी सुरज वाघमारे, मुख्य अभियंता गिरीश जोशी, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता रुपा गिरासे आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, शासनाला उत्पन्न देणाऱ्या विभागांकडून मोठ्या प्रमाणावर कर गोळा करण्यात येत आहे. या विभागांना चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहे. विकासकामे करताना पुढील काळाचा विचार ठेवण्यात आला आहे. सारथी संस्थेमध्ये ३०० आसन क्षमतेचे श्रोतागृह मंजूर आहे. मात्र याठिकाणी ५०० विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय राहणार आहे. त्यामुळे राज्यातील सर्व सारथीच्या ठिकाणी आता ५०० क्षमतेचे श्रोतागृह राहणार आहे. यासाठी लागणारा अतिरिक्त निधीही देण्यात येणार आहे. एकाच दिवशी १४२० कोटी रूपयांच्या विविध कामांचे लोकार्पण, भूमिपूजन करण्यात आले आहे. या सुविधांचा नागरिकांना लाभ होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

अमरावती महापालिकेकडून वाढीव दराने कर आकारणी केली आहे. त्यामुळे तात्काळ सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करून नागरिकांना करपावत्या देण्यात याव्यात. कोणत्याही परिस्थितीत ऑक्टोबरपर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्यात यावी, असे निर्देश दिले. सर्व घटकांचा विकास होण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. त्याचा भाग म्हणून मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, मुलींना मोफत शिक्षण, बारावीनंतर विद्यावेतन, शेतकऱ्यांना मोफत वीज, दुधाला अनुदान, तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यात येत आहे.

सारथी, बार्टी सारख्या संस्था उभारून अध्ययनासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यात येत आहे. त्यासोबतच विभागीय स्तरावर चांगल्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सुविधांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा. खाशबा जाधव यांच्यानंतर यावर्षी राज्यातील खेळाडूने वैयक्तिक पदक प्राप्त केले आहे. खेळाडूंना तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळाल्यास भविष्यात पदक मिळवणारे खेळाडू राज्यातून तयार होतील, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. विभागीय, जिल्हा आणि तालुका क्रीडा संकुलासाठी निधी वाढवून देण्यात आला आहे. त्यामुळे या क्रीडा सुविधा प्राधान्याने उभ्या राहतील.

अमरावती येथील पाणी पुरवठ्याची अमृत योजना, सारथीचे विभागीय कार्यालय, वसतिगृह, अभ्यासिका, लालखडी रेल्वे उड्डाणपूल, चांगापूर फाटा रस्ता, विभागीय क्रीडा संकुल मैदानाचे भूमिपूजन तर जिल्हा स्त्री रूग्णालयाच्या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले आहे. त्यासोबतच वस्तू व सेवा कर इमारतीचे नुतनीकरण, विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेतील क्रीडा सुविधा, उत्पादन शुल्कच्या इमारतीचे उद्घाटन, वडाळी उद्यान सौंदर्यीकरणाचे उद्घाटन करण्यात आले, तसेच नगरोत्थान अभियानातील कामांचे ऑनलाईन भूमिपूजन करण्यात आले.क्षिप्रा मानकर यांनी सूत्रसंचालन केले. उपजिल्हाधिकारी विवेक जाधव यांनी आभार मानले.

# दप्तरमुक्तीची शासकीय घोषणा कागदावरच; पालक चिंताग्रस्त : विद्यार्थ्यांच्या पाठीवर ओझे कायमच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

शाळेतील विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे फारच वाढले असल्याने अनेक विद्यार्थ्यांना पाठदुखीसारखे आजार जडत आहेत. इंग्रजी शाळेत कॉन्व्हेंटपासूनच विद्यार्थ्यांना विविध विषय असतात. त्यामुळे प्रत्येक विषयाची वही, पुस्तके आणि व्यवसाय पुस्तके सोबत आणावी लागतात. परिणामी दप्तराचे ओझे वाढते. बालवयातच सुरू झालेल्या या पाठदुखीच्या आजारांमुळे पालकांची चिंता वाढली आहे.



दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी राज्य शासनाने अनेकदा घोषणा केल्या. त्यासाठी शालेय पातळीवर सूचनाही देण्यात आल्या. सरकारने पुस्तकांमध्येच वह्यांची पाने जोडून देण्यासह अनेक उपाययोजना राबवल्याशाळांनीही त्यांच्या पातळीवर ओझे कमी करण्यासाठी अनेक प्रयोगही राबवले. मात्र, त्यात सातत्य नसल्याने उपाययोजना कागदावरच राहिल्याअसून, वह्या पुस्तकांची संख्या वाढतच गेली. आता विद्यार्थ्यांना त्याचा त्रास सुरू झाला असला तरी सर्वच पातळ्यांवर त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे.

**अंमलबजावणीच्या सातत्याचा अभाव**

राज्यातील सर्व शाळांतील पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारी पाठ्यपुस्तके एकात्मिक स्वरूपात चार भागांमध्ये विभागून प्रत्येक पाठ, कवि- तेनंतर गरजेनुसार कोरी पाने समाविष्ट करावी, अशी अंमलबजावणी करण्याची सूचना केली. पाठ्यपुस्तकात देण्यात आलेल्या पानांचा वापर विद्यार्थ्यांना करता येईल, अशा सूचना दिल्या होत्या. त्यानुसार त्याची कार्यवाही करण्यात आली. मात्र, त्यामध्ये सातत्य राहत नसल्याचे स्पष्ट होत आहे. शाळेत मिळणारे पाणीही स्वच्छ, शुद्ध नसल्याचे अनेक पालकांचे मत आहे.

# लाडक्या बहिणीला मिळाले दीड हजार पण आता प्रतीक्षा गॅस सिलेंडरची

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती ९**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत पात्र महिलांना प्रतिमहिना दीड हजार आणि वर्षाला तीन मोफत सिलिंडर देण्याची घोषणा राज्य सरकारने केली.



या घोषणेला महिनाभराचा कालावधी उलटला; परंतु अजूनपर्यंत योजनेची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे 'लाडक्या बहिणीं'ना लाभाची प्रतीक्षाच आहे. गरीब व गरजू महिलांचे सक्षमीकरण व्हावे, तसेच त्यांना आरोग्य जपण्यासाठी आर्थिक साहाय्य लाभावे, यासाठी राज्य शासनाच्या वतीने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना लागू केली. जुलै व ऑगस्ट महिन्याचे अर्थसाहाय्य महिलांच्या बँक खात्यात वळते करण्यात आले; परंतु त्यानंतर घोषणा केलेल्या मोफत सिलिंडरचा लाभ अजूनपर्यंत महिलांना देण्यात आलेला नाही.सदर लाभ कधी मिळणार, याची प्रतीक्षा जिल्हाभरातील लाभार्थी महिलांना आहे. अनेक नागरिक गॅस एजन्सीत सिलिंडरबाबत चौकशी करीत आहेत. शासनाने लवकर मोफत सिलिंडर योजनेची अंमलबजावणी करावी, अशी मागणी महिलांनी केली.

### वर्षाला तीन सिलिंडर

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेंतर्गत महिलांना दर वर्षाला तीन सिलिंडर मोफत दिले जाणार आहेत. या योजनेमुळे महिलांना गॅस सिलिंडरवर होणारा खर्च बचत करता येईल. ग्रामीण भागातील बहुतांश महिलांकडे गॅस सिलिंडर आहेत. उज्वला योजनेतून सदर सिलिंडर प्राप्त झाले. काही सिलिंडर वन विभागाच्या योजनेतून मिळालेले आहेत.

# नवरात्रोत्सवासाठी बाजारपेठांना चढला रंग घटस्थापनेसाठी लागणारे साहित्य दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

श्रीगणेशाची मनोभावे सेवा केल्यानंतर देवीच्या आगमनासाठी भाविक सज्ज झाले आहे. बहुतांश सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाच्या अंतिम बैठका पार पडल्या असून, वर्गणी गोळा करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. दुसरीकडे नवरात्रोत्सवानिमित्त बाजारपेठा सजू लागल्या असून, घटस्थापनेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी गर्दी वाढू लागली आहे. या साहित्याच्या किमतीमध्ये फार मोठी वाढ झाली नसली, तरी बाजाराचा ट्रेंड सांभाळण्यासाठी ग्राहकांसह मंडळांना काहीशी आर्थिक झळ सोसावी लागत असल्याचे नवरात्रोत्सव मंडळांकडून सांगण्यात आले.

### बाजारात ट्रेंड काय?

मागील वर्षी लायटिंग, गेट, स्टेजसह डेकोरेशनसाठी मंडळाला आर्थिक झळ सोसावी लागली. यावर्षी या खर्चामध्ये वाढ होण्याची शक्यता अधिक आहे. कुर्त्यासह विविध भागांतील कापूर, अगरबत्तीच्या मार्केटमध्ये पूजेच्या साहित्याचे दर अद्याप स्थिर असल्याचे चित्र आहे. देवीला वाहण्यासाठी यंदा लाल, गुलाबी, पिवळ्या, हिरव्या रंगाच्या चुनरी बाजारात आल्या असून, त्यावरील सोनेरी चमकीचे नक्षीकाम ग्राहकांना आकर्षित करत आहे. अलंकाराच्या मार्केटमध्ये देवीसाठीचे मंगळसूत्र, बांगड्या, कर्णफुले यांची मागणी सध्या प्राथमिक स्तरावर असून, शनिवार आणि रविवारी ती अधिक वाढण्याचे संकेत आहेत.

### विविध पथकही तयार

गरबा, इतर सोहळ्यासाठी लागणारे डिस्को जॉकी, बेंजो, ढोल, लेझीम पथक आदींची बुकिंग यंदाही फुल्ल झाली आहे. सध्या डीजेसाठी किमान पन्नास हजार मोजावे लागणार आहे. हे दर कमी अधिकही असू शकतात. त्यामुळे यावर्षी देवी मंडळांकडून बँड पथकांनाच पाचारण केले जाण्याची शक्यता अधिक आहे.

# अमरावती शहराच्या विकासासाठी कटिबध्द - प्रविण पोटे पाटील

## नवसारी प्रभागातील विकास कामांचे भूमिपूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि२६ अमरावती**

भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते नवसारी प्रभागातील विविध विकास कामांचे भूमिपूजन संपन्न झाले यात प्रामुख्याने रस्ते डांबरीकरण , कॉंक्रिट रस्ते, नाली बांधकाम, पेव्हींग ब्लॉक, बसविणे, उद्यानाचे नूतनीकरण, उद्यानात ट्रॅक बसविणे अश्या कामांचा समावेश आहे..अमरावती शहरातील विकासाकरिता नेहमी कटिबद्ध असून येणाऱ्या दिवसांमध्ये संपूर्ण शहराचा पूर्ण विकास करण्याचे ध्येय असल्याचे प्रतिपादन यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले यावेळी रीताताई मोकलकर, अभिजित वानखडे, श्याम पाध्ये, ऋषिकेश देशमुख, सागर महल्ले सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सैन्यदलात अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अकोला**

भारताचे सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या परीक्षेची पूर्वतयारी नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रातर्फे करून घेतली जाते. हे विनामूल्य प्रशिक्षण असून, जिल्ह्यातील तरूण- तरूणींनी संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.नाशिक येथील केंद्रात पुढील सत्र (एसएसबी कोर्स क्र. ५८) दि. १४ ते २३ ऑक्टोबर दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना विनामूल्य प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

# 'महाशक्ती'२८८ जागांवर लढणार राजू शेट्टी व कडू पाहणार ग्राउंडवरील काम

## छत्रपती संभाजीनगरच्या बैठकीनंतर जागावाटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नागपूर**

आमची महाशक्ती आहे. महायुती किंवा महाविकास आघाडी नाही. आगामी विधानसभा निवडणुकीत महाशक्ती म्हणून समोर जाणार व सर्व २८८ जागांवर लढणार. छत्रपती संभाजीनगर येथील बैठक झाल्यावर जागावाटपाची रचना करणार, असे प्रहारचे नेते आ. बच्चू कडू यांनी सांगितले.



नागपुरात पत्रकारांशी बोलताना आ. कडू म्हणाले, महाशक्तीचे जागावाटप कसे होईल ते पाहू. राजू शेट्टी व मी ग्राउंडवरील काम पाहणार आहोत. अमित शाह यांनी विदर्भातील ४५ जागा जिंकण्याचा निर्धार केला. त्यांनी लोकसभेतही असाच निर्धार केला होता. पण हा गुजरात नाही महाराष्ट्र आहे, असा टोलाही त्यांनी लगावला. संजय राऊत हे शिवसेनेचे आकाशवाणी केंद्र आहे त्यामुळे ते रोज बोलत असतात. कुठल्याही मंत्र्याचा महाराष्ट्रात वचक नाही.